# महाराष्ट्र विधानपरिषद

## दुसरे अधिवेशन, २०१९

---

### तारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**शुक्रवार, दिनांक २१ जून, २०१९ / ज्येष्ठ ३१, १९४१ (शके)**

| | | |
|---|---|---|
| **(१)** | **उद्योग, खनिकर्म मंत्री** | **यांचे प्रभारी विभाग** |
| **(२)** | **ऊर्जा, नवीन व नवीकरणीय ऊर्जा, राज्य उत्पादन शुल्क मंत्री** | |
| **(३)** | **पणन व वस्त्रोद्योग मंत्री** | |
| **(४)** | **सहकार मंत्री** | |
| **(५)** | **सामाजिक न्याय मंत्री** | |
| **(६)** | **आदिवासी विकास मंत्री** | |

---

**प्रश्नांची एकूण संख्या - ७७**

---

### यवतमाळ जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेची नोकर भरती खुल्या संवर्गातून केल्याबाबत

**(१) * ४७३६४ श्री.हरिसिंग राठोड, श्री.रामहरी रुपनवर, डॉ.वजाहत मिर्झा :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) यवतमाळ जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेची नोकर भरती आरक्षण धोरणाकडे दुर्लक्ष करुन सर्व जागा खुल्या संवर्गातून भरण्यात येणार असल्याची जाहिरात माहे फेब्रुवारी-मार्च, २०१९ मध्ये वा त्यादरम्यान प्रसिध्द करण्यात आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, महाराष्ट्र आरक्षण कायदा २००४ प्रमाणे ही नोकर भरती करण्यात येत नसुन आरक्षण कायद्यातील तरतुदींचे पालन होत नसल्याने यवतमाळ जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेची नोकर भरती नियमबाह्य आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, तद्नुसार सदर जाहिरात रद्द करून सुधारित जाहिरात काढून मागासवर्गीय समाजास न्याय मिळवून देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.सुभाष देशमुख :** (१) व (२) नाही.

यवतमाळ जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेने खुल्या प्रवर्गातुन सरळसेवा भरतीची जाहिरात दिनांक ०८/०३/२०१९ रोजी प्रकाशित केली आहे, तथापी आरक्षण कायद्यानुसार ज्या जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकामध्ये शासनाचे भागभांडवल नाही त्यांना आरक्षण कायदा लागू होत नाही. यवतमाळ जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेमध्ये शासनाचे भागभांडवल नसल्याने सदर बँकेस आरक्षण कायदा लागू होत नाही.
(३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यातील कांदा उत्पादक शेतकऱ्यांना कमी बाजारभाव मिळत असल्याबाबत

**(२) * ४७९७३ श्री.चंद्रकांत रघुवंशी, ॲड.राहुल नार्वेकर, श्री.विक्रम काळे : तारांकित प्रश्न क्रमांक ४४९२३ ला दिनांक २९ नोव्हेंबर, २०१८ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील कांदा उत्पादक शेतकऱ्यांना माहे डिसेंबर, २०१८ व जानेवारी, २०१९ या दोन महिन्यात मागील वर्षाच्या तुलनेत कमी बाजारभाव मिळाल्यामुळे शेतकऱ्यांचे कोट्यवधी रुपयांचे नुकसान झाले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, आशिया खंडातील सर्वात मोठी कांद्याची बाजारपेठ असलेल्या लासलगांव (जि.नाशिक) येथील कांदा लिलाव माहे मार्च महिन्याच्या अखेरपर्यंत बंद ठेवण्यात आला असून उत्पादन खर्चाच्या तुलनेत कांदयाला भाव मिळत नसल्याने कांदा उत्पादक शेतकऱ्यांनी शासनाच्या विरोधात राज्यात विविध ठिकाणी आंदोलने केली, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन राज्यातील अडचणीत सापडलेल्या कांदा उत्पादक शेतकऱ्यांच्या समस्या सोडविण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.सुभाष देशमुख :** (१) अंशत: खरे आहे.
(२) नाही.

दरवर्षीप्रमाणे व्यापारी वर्गास मार्च वर्षाअखेरचे हिशोब पूर्ण करण्यासाठी त्यांच्या मागणीप्रमाणे दिनांक २६/३/२०१९ ते ३०/३/२०१९ या कालावधीत कांदा लिलाव बंद ठेवले होते.
(३) राज्यात कांद्याला मिळणारा कमी बाजारभाव लक्षात घेऊन, कांदा उत्पादक शेतकऱ्यांना आर्थिक सहाय्य करण्याच्या दृष्टीने दिनांक १ नोव्हेंबर, २०१८ ते दिनांक २८ फेब्रुवारी, २०१९ या कालावधीत कृषी उत्पन्न बाजार समितीमध्ये कांदा विक्री केलेल्या शेतकऱ्यांना रुपये २०० प्रति क्विंटल व जास्तीत जास्त २०० क्विंटल प्रति शेतकरी या प्रमाणात अर्थसहाय्य मंजूर करण्यात आले आहे. या अंतर्गत दिनांक १ नोव्हेंबर, २०१८ ते दिनांक १५ डिसेंबर, २०१८ या पहिल्या टप्प्यातील कालावधीसाठी रुपये ११४.८० कोटी इतका निधी उपलब्ध करुन दिला असून, तो शेतकऱ्यांना वितरीत करण्यात आला आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## जात पडताळणी समितीच्या अध्यक्षा व सदस्यांना लाच प्रकरणी निलंबित करण्याबाबत

**(३) * ४६९३९ ॲड.अनिल परब, श्री.रविंद्र फाटक, डॉ.(श्रीमती) मनिषा कायंदे : तारांकित प्रश्न क्रमांक ४३९६८ ला दिनांक २२ नोव्हेंबर, २०१८ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) जात पडताळणी समितीच्या अध्यक्षा, सदस्य आणि सदस्य सचिव यांच्या लाच प्रकरणाची चौकशी करण्यासाठी महाराष्ट्र अनुसूचित जाती, अनुसूचित

जमाती, भटक्या जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागास प्रवर्ग (जातीचे प्रमाणपत्र देण्याचे व त्याच्या पडताळणीचे विनियमन) अधिनियम, २००० मधील तरतुदीनुसार सहसचिव (आस्था) यांची नियुक्ती करण्यात आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी मा.मुख्यमंत्री महोदयांनी दोषींना निलंबित करण्याबाबतचे आश्वासन दिले होते, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन चौकशीचा अहवाल सादर केला आहे काय, त्यानुषंगाने संबंधितावर कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. सुरेश (भाऊ) खाडे :** (१) होय.

(२) हे खरे नाही.

(३) चौकशीची कार्यवाही सुरु आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यातील शेतकऱ्यांना संपूर्ण कर्जमाफी मिळणेबाबत

**(४) * ४७७०८ श्री.किशोर दराडे, श्री.दत्तात्रय सावंत, श्री.बाळाराम पाटील, श्री.आनंदराव पाटील, श्री.शरद रणपिसे, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.रामहरी रुपनवर, श्री.अमरनाथ राजूरकर, डॉ.सुधीर तांबे, ॲड.हुस्नबानू खलिफे, डॉ.वजाहत मिर्झा, श्री.हरिसिंग राठोड, श्री.विक्रम काळे, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.धनंजय मुंडे, श्री.सतिश चव्हाण :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात सतत दुष्काळ, नापिकी यामुळे शेतकरी मोठ्या प्रमाणात कर्जबाजारी झाला असून शासनाने माहे जुलै, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान राज्यातील शेतकऱ्यांना कर्जमाफीची घोषणा केली असून या कर्जमाफीत शासनाने सन २००९ ते दिनांक ३० जून, २०१६ पर्यंत थकीत असलेल्या थकबाकीदार शेतकऱ्यांनाच निकषानुसार १५०००० रुपयांचे कर्ज माफ केले परंतु राहिलेली रक्कम भरल्याशिवाय १५०००० माफ झालेल्या रक्कमेचा फायदा शेतकऱ्यांना झालेला नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, परभणी जिल्ह्यातील ३४७००० शेतकऱ्यांनी कर्ज माफीसाठी ऑनलाईन अर्ज दाखल केलेले असतानांही केवळ १५०००० शेतकऱ्यांना कर्ज माफीचा लाभ देण्यात आला असून राज्यातील कर्जमाफीच्या लाभापासून वंचित राहिलेल्या शेतकऱ्यांच्या अर्जाची पुन्हा छाननी करुन अशा शेतकऱ्यांना ग्रीनलीस्टमध्ये आणणार असल्याचे शासनाने दिनांक १ मार्च, २०१९ रोजी वा त्यासुमारास जाहीर केले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, राज्यातील सर्व बँका, सहकार विभाग यांच्यातील असमन्वयामुळे शेतकरी कर्जमाफीपासून वंचित राहिला असल्याने त्यांच्याविरुध्द कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) असल्यास, राज्यातील सर्व शेतकऱ्यांना संपूर्ण कर्जमाफी देण्याबाबत तसेच दिनांक ३० जून, २०१६ नंतरच्या थकबाकीदार शेतकऱ्यांना कर्जमाफी देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.सुभाष देशमुख :** (१) छत्रपती शिवाजी महाराज शेतकरी सन्मान योजना ही कर्जमाफी योजना शासन निर्णय, दिनांक २८ जून २०१७ अन्वये जाहीर करण्यात आली आहे. सदर शासन निर्णयानुसार रुपये १.५० लाखावरील रक्कम पात्र शेतकऱ्यांनी भरावयाची आहे. दिनांक ३१/५/२०१९ अखेर एकूण १९५६१४ शेतकऱ्यांनी रुपये १.५० लाखावरील कर्जाची रक्कम भरली असलेने एकरकमी परतफेड योजनेचा लाभ रुपये २०४०.०३ कोटी देण्यात आला आहे. रुपये १.५० लाखावरील रक्कम भरुन एक रकमी परतफेड योजनेचा लाभ घेणेसाठी शासनाने वेळोवेळी मुदत वाढ दिली आहे. सदर मुदत वाढीचा कालावधी दिनांक ३०/६/२०१९ अखेर आहे.

वरील शासन निर्णयानुसार शेतकऱ्यांना एकरकमी परतफेड योजनेचा लाभ देण्यात येत आहे.
(२) छत्रपती शिवाजी महाराज शेतकरी सन्मान योजना २०१७ अंतर्गत परभणी जिल्ह्यातील शेतकऱ्यांना दिनांक ३१/५/२०१९ अखेर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक, महाराष्ट्र ग्रामीण बँक व राष्ट्रीयकृत बँकेमार्फत कर्जमाफीचा एकूण १२९०१८ शेतकऱ्यांना रुपये ८३८३०.५३ लाखाचा, एकरकमी परतफेड योजनेचा एकूण ४२६० शेतकऱ्यांना रुपये २७८३.३३ लाखाचा व प्रोत्साहनपर रकमेचा

एकूण २३३३२ शेतकऱ्यांना रुपये २९०२.६४ लाख रकमेचा असे एकूण १५६६१० शेतकऱ्यांना रुपये ८८९१७.५० लाख रकमेचा सदर योजनेखाली लाभ देणेत आला आहे.

तसेच महाऑनलाईनव्दारे सदर योजनेनुसार पोर्टलवर कर्जमाफीस अपात्र ठरलेल्या ८९,५४४ कर्जमाफीचे खाते तालुकास्तरीय समितीकडे फेरतपासणीसाठी पाठविण्यात आलेले असून तालुकास्तरीय समितीकडे फेर तपासणीचे कामकाज चालू आहे.

(३) मुद्दा क्रमांक १ व २ मधील बाबी विचारात घेता राज्यातील शेतकरी कर्जमाफी पासून वंचित राहिला असे म्हणता येणार नाही. त्यामुळे कार्यवाही करण्याचा प्रश्न उद्भवत नाही.

(४) सद्य:स्थितीत दिनांक २८/०६/२०१७ चा शासन निर्णय व त्यामध्ये वेळोवेळी केलेल्या बदलानुसार शेतकऱ्यांना कर्जमाफीचा लाभ देण्याची कार्यवाही सुरु आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यातील दिव्यांगाच्या प्रलंबित धोरणाबाबत

**(५) * ४७३११ आर्कि.अनंत गाडगीळ, श्री.शरद रणपिसे, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.रामहरी रुपनवर, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.आनंदराव पाटील :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात मोठ्या संख्येने दिव्यांग बेरोजगार असून दिव्यांगाच्या नोकरीतील आरक्षणाचा टक्का वाढविण्यासोबतच स्थानिक स्वराज्य संस्थातून दिव्यांगाच्या कल्याणकारी योजनांचा खर्च केल्या जाणाऱ्या ३ टक्के निधीच्या प्रमाणात वाढ करावी यासाठी शासनाने तयार केलेले दिव्यांग धोरण प्रलंबित असल्यामुळे दिव्यांगाच्या योजनावर विपरीत परिणाम झाला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, दिव्यांगाना नोकऱ्या देण्याबाबत अनेक वेळा आंदोलने करुनही शासनाने दुर्लक्ष केल्याने माहे फेब्रुवारी, २०१९ मध्ये वा त्यादरम्यान मंत्रालयावर दिव्यांग बेरोजगारांनी रोजगार द्या, नाहीत विष द्या असा संताप मोर्चा काढला होता, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, शासनाने किती बेरोजगार दिव्यांगांना नोकऱ्या दिल्या व या बेरोजगारांना रोजगार देण्याबाबत शासनाची भुमिका काय आहे,
(४) असल्यास, सदर धोरणावर निर्णय घेऊन त्याची अंमलबजावणी करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. सुरेश (भाऊ) खाडे :** (१) हे खरे नाही.
(२) हे खरे नाही.

दिनांक २५/०२/२०१९ रोजी राज्यस्तरीय कर्णबधीर असोसिएशन, औरंगाबाद या संघटनेने अपंग कल्याण आयुक्तालयासमोर आंदोलन केले. सदर आंदोलनाच्या अनुषंगाने आंदोलकांनी केलेल्या मागण्यांवर निर्णय घेण्याकरीता दिनांक १०/०३/२०१९ रोजीच्या शासन निर्णयान्वये मा.मंत्रिमंडळ उपसमिती गठीत करण्यास मान्यता देण्यात आली आहे.
(३) शासन निर्णय, दिनांक २०/०२/२०१९ अन्वये महाराष्ट्र राज्याचे दिव्यांग धोरण निश्चित करण्यात आले आहे. सदर धोरणामध्ये प्रशिक्षण व रोजगार, दिव्यांग व्यक्तींना सक्षमीकरण करण्याच्या दृष्टीने पुनर्वसन सेवा, उच्च आधाराची गरज असणाऱ्या अपंग व्यक्तींच्याबाबतीत विशेष तरतुदी आणि प्रत्यक्ष लाभ बँक खात्यात थेट जमा होण्याची योजना, औद्योगिक सामाजिक जबाबदारी, दिव्यांग मुली व दिव्यांग स्त्रियांसाठी विशेष तरतुदी, नियोजन व अंदाजपत्रकीय तरतुद आदी महत्वपूर्ण तरतुदी धोरणामध्ये करण्यात आलेल्या आहेत.
(४) सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाने शासन निर्णय, दिनांक २०/०२/२०१९ अन्वये महाराष्ट्र राज्याचे दिव्यांग धोरण लागू केलेले आहे. त्या अनुषंगाने कार्यवाही करण्यात येत आहे.
(५) प्रश्नच उद्भवत नाही.

-----------------

## राज्यात वीज दरवाढ करण्याचा निर्णय शासनाने घेतल्याबाबत

**(६) * ४६७४६ डॉ.(श्रीमती) नीलम गोऱ्हे, श्री.हेमंत टकले, श्री.धनंजय मुंडे, श्री.किरण पावसकर, श्री.विक्रम काळे, श्री.आनंद ठाकूर, ॲड.राहुल नार्वेकर, श्री.सतिश चव्हाण, श्रीमती विद्या चव्हाण, श्री.अनिकेत तटकरे, श्री.जगन्नाथ शिंदे, श्री.रामराव वडकुते, श्री.ख्वाजा बेग, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.अनिल भोसले, श्री.शरद रणपिसे, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.आनंदराव पाटील, श्री.रामहरी रुपनवर, ॲड.हुस्नबानू खलिफे, डॉ.सुधीर तांबे, आर्कि.अनंत गाडगीळ, डॉ.वजाहत मिर्झा, श्री.हरिसिंग राठोड, श्री.अमरनाथ राजूरकर, श्री.मोहनराव कदम, ॲड.अनिल परब, डॉ.(श्रीमती) मनिषा कायंदे, श्री.रविंद्र फाटक, श्री.रामदास आंबटकर, प्रा.अनिल सोले, श्री.नागोराव गाणार, श्री.अमरिशभाई पटेल, श्री.प्रसाद लाड, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.प्रकाश गजभिये, ॲड.निरंजन डावखरे, श्री.चंद्रकांत रघुवंशी, श्री.नरेंद्र दराडे, श्री.दत्तात्रय सावंत, श्री.बाळाराम पाटील :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील वीज दर शेजारील सर्व राज्यांपेक्षा जास्त असतानाही राज्य वीज नियामक आयोगाच्या आदेशानुसार माहे एप्रिल, २०१९ पासून वीज दरवाढ करण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, दिनांक १२ सप्टेंबर, २०१८ रोजी वा त्यासुमारास वीज वितरण कंपन्यांच्या नव्या वीज दरास मान्यता दिल्यानुसार अदानी पॉवर आणि महावितरण यांच्यामध्ये झालेल्या व्यावसायिक कराराच्या अटी काय आहेत तसेच माहे सप्टेंबर, २०१८ ते माहे एप्रिल, २०१९ पासून महावितरण व अदानीच्या देयकातील दरवाढ ही सरासरी ३ टक्के होणार असली तरी प्रत्यक्ष वीज देयकात इंधन समायोजन आकाराची भर पडणार असल्याने घरगुती, औदयोगिक आणि कृषीपंपधारक वीज ग्राहकांवर दरवाढीचा भूर्दंड ६ टक्क्यांपेक्षा जास्त होणार असल्याची माहिती वीज तज्ञांनी दिली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, ही दरवाढ कमी करण्यासाठी घरगुती, उद्योजक व कृषीपंपधारक यांनी शासन व महावितरणाच्या विरोधात आंदोलने केली असून अदानी इलेक्ट्रिसिटी मुंबई लि. कंपनीने मुंबई उपनगरातील वीज ग्राहकांना

नियमित दरापेक्षा वाढीव दराने वीज देयके आकारल्याचे स्पष्ट झालेले असल्याने शासनाने चौकशीचे आदेश दिल्यानंतर वीज नियामक आयोगाने याबाबत चौकशी करण्यासाठी द्विसदस्यीय समिती नेमली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, वीज दरवाढ कमी करण्यासाठी शासनाने कोणत्या उपाययोजना केल्या वा करण्यात येत आहेत,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.चंद्रशेखर बावनकुळे :** (१) महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगाच्या दिनांक १२ सप्टेंबर, २०१८ च्या आदेशानुसार दिनांक १ एप्रिल, २०१९ पासून सुधारित वीजदर लागू झाले असून आर्थिक वर्ष २०१८-१९ च्या तुलनेत साधारणत: ३% वाढ झाली आहे.

(२) महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगाने मंजूर केलेले वीज खरेदी दर व वेळोवेळी होणारा कायद्यातील बदल यामुळे होणारा अतिरिक्त वीज खरेदी खर्च आयोगाच्या आदेशानुसार, वीज निर्मिती कंपन्यांना देणे महावितरण कंपनीस बंधनकारक आहे.

(३) महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगाद्वारे मुंबई उपनगरातील ग्राहकांना पाठविण्यात आलेल्या वाढीव वीज देयकांची शहानिशा करुन त्यात दुरुस्ती करण्याची आवश्यकता आहे किंवा कसे तसेच अशा प्रकारच्या घटना होऊ नये म्हणून उपाययोजना सूचविण्यासाठी द्विसदस्यीय समितीची नेमणूक करण्यात आली आहे. अद्याप समितीचा अहवाल आयोगाकडे अप्राप्त आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## अपंग शाळेतील कर्मचाऱ्यांना सातवा वेतन आयोग लागू करण्याबाबत

**(७) * ४७७२३ डॉ.सुधीर तांबे, श्री.शरद रणपिसे, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.दत्तात्रय सावंत, श्री.विक्रम काळे, श्री.सतिश चव्हाण, श्री.बाळाराम पाटील :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील सर्व शासकीय कर्मचाऱ्यांना शासनाने सातवा वेतन आयोग लागू केला असून त्याप्रमाणे वेतन देखील सुरु केले आहे परंतु सामाजिक न्याय विभागामार्फत चालविण्यात येणाऱ्या अपंग शाळेतील कर्मचाऱ्यांना सातवा वेतन आयोग लागू करण्यात आलेला नाही, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, अपंग शाळेतील कर्मचाऱ्यांना सातवा वेतन आयोग लागू करण्याबाबत शासन परिपत्रक केव्हापर्यंत निर्गमित करणार आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. सुरेश (भाऊ) खाडे :** (१) होय.
(२) अपंग शाळेतील कर्मचाऱ्यांना सातवा वेतन आयोग लागू करण्याबाबतचा प्रस्ताव आयुक्त, अपंग कल्याण, पुणे यांच्याकडून दिनांक १५/०४/२०१९ रोजी शासनास प्राप्त झाला आहे. सदरहू प्रस्तावावर नियमानूसार कार्यवाही सुरु आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## अभियांत्रिकी महाविद्यालयातील विद्यार्थ्यांचे शुल्क समाजकल्याण विभागाकडून वेळेत मिळण्याबाबत

**(८) * ४७६५५ प्रा.जोगेन्द्र कवाडे, श्री.नागोराव गाणार, श्री.दत्तात्रय सावंत, श्री.बाळाराम पाटील, श्री.विक्रम काळे, डॉ.सुधीर तांबे, श्री.धनंजय मुंडे, श्री.अनिकेत तटकरे, श्री.सतिश चव्हाण, श्री.जगन्नाथ शिंदे, श्री.किरण पावसकर :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) अभियांत्रिकी महाविद्यालयातील मागासवर्गीय विद्यार्थ्यांचे शिक्षण शुल्क समाजकल्याण विभागामार्फत दिले जाते, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, समाजकल्याण विभागाने मागासवर्गीय विद्यार्थ्यांचे शुल्क महाविद्यालयांकडे गेली चार वर्षे जमा केले नसल्याची बाब माहे मार्च, २०१९ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली असून शिक्षण शुल्क जमा न केल्यामुळे सरदार पटेल अभियांत्रिकी महाविद्यालयाने दिनांक २४ एप्रिल,

२०१९ रोजी वा त्यासुमारास आयोजित केलेल्या पदवीदान समारंभात ६३ मागासवर्गीय विद्यार्थ्यांना पदवी प्रमाणपत्र देण्याचे नाकारुन अपमानित केले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर शिक्षण शुल्क वेळेत महाविद्यालयास मिळत नसल्यामुळे महाविद्यालय विद्यार्थ्यांची अडवणूक करीत असल्याच्या तक्रारी शासनास प्राप्त झाल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन संबंधित महाविद्यालयाला शिक्षण शुल्क प्रतिपूर्ती रक्कम वेळेत न देण्यास जबाबदार असलेल्या अधिकारी व कर्मचाऱ्यांविरुध्द आणि नियमाविरुध्द विद्यार्थ्यांकडून शुल्क वसूल करणाऱ्या व मागासवर्गीय विद्यार्थ्यांना अपमानास्पद वागणूक देणाऱ्या महाविद्यालय प्रशासनाविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे, तसेच मागासवर्गीय विद्यार्थ्यांना त्यांचे पदवी प्रमाणपत्र कधीपर्यंत देण्यात येणार आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. सुरेश (भाऊ) खाडे :** (१) अंशत: होय, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागामार्फत अभियांत्रिकी महाविद्यालयातील अनुसूचित जाती प्रवर्गातील विद्यार्थ्यांची शैक्षणिक फी दिली जाते.

(२) व (३) नाही, सरदार पटेल अभियांत्रिकी महाविद्यालयातील सन २०१५-१६ ते २०१७-१८ पर्यंत अनुसूचित जाती प्रवर्गातील विद्यार्थ्यांची शिक्षण शुल्क, परीक्षा शुल्काची देय रक्कम महाविद्यालयास अदा करण्यात आलेली आहे. सदर महाविद्यालयाची सहायक आयुक्त, समाजकल्याण यांच्याकडे अनुसूचित जाती प्रवर्गातील शिक्षण शुल्क व परीक्षा शुल्काची रक्कम प्रलंबित नाही.

सदर महाविद्यालयातील सन २०१५-१६ मधील ज्या विद्यार्थ्यांनी विकास शुल्काची रक्कम महाविद्यालयास अदा केली नाही, अशा विद्यार्थ्यांना पदवी प्रमाणपत्र देणार नसल्याची तोंडी तक्रार सदर महाविद्यालयातील ४-५ विद्यार्थ्यांनी सहायक आयुक्त, समाजकल्याण यांच्याकडे दिनांक २२/०४/२०१९ रोजी केली होती.

(४) सहायक आयुक्त, समाजकल्याण, मुंबई उपनगर यांनी संबंधित महाविद्यालयाच्या प्राचार्यांना महाविद्यालयातील मागासवर्गीय विद्यार्थ्यांकडून फी वसूल अथवा कागदपत्रांची अडवणूक केल्यास फौजदारी स्वरुपाचा गुन्हा दाखल करण्यात येईल, अशी सक्त ताकीद दिनांक २३/०४/२०१९ च्या पत्रान्वये देण्यात आली असून, विद्यार्थ्यांच्या पदवीदान समारंभात संबंधित विद्यार्थ्यांना पदवी प्रमाणपत्र देण्याबाबत संबंधित प्राचार्यांना सूचित करण्यात आले आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## पंढरपूर शहरातील निवासी मूकबधिर शाळेतील अल्पवयीन मुलीवर अत्याचार झाल्याबाबत

**(९) * ४७१४४ डॉ.(श्रीमती) मनिषा कायंदे :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पंढरपूर शहरातील निवासी मूकबधिर शाळेतील अल्पवयीन मुलीवर शाळेतील शिक्षकच लैंगिक अत्याचार करीत असल्याची घटना माहे एप्रिल, २०१९ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, पिडीत अल्पवयीन मुलींबाबत काय निर्णय घेण्यात आला वा येत आहे,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार दोषी शिक्षकांविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. सुरेश (भाऊ) खाडे :** (१) होय.
(२) व (३) सदरहू प्रकरणी दिनांक ३०/०३/२०१९ रोजी शाळेतील ४ कर्मचाऱ्यांवर पोलीस ठाणे पंढरपूर येथे गुन्हा नोंद झाला असून त्यांना त्याच दिवशी अटक करण्यात आली व पिडीत मुलीला तिच्या पालकांच्या स्वाधीन करुन सद्य:स्थितीत ती तीच्या घरी आहे. उक्त ४ आरोपी शिक्षकांना जिल्हा सत्र न्यायालय, पंढरपूर यांनी जामिन दिला असून संस्थेने या घटनेमुळे

चौघांना निलंबित केले आहे. सदर प्रकरण न्यायप्रविष्ट असून पोलीस तपासाधीन आहे. सदर शाळेची मान्यता रद्द करण्यात येत आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## यवतमाळ जिल्ह्याला संजय गांधी निराधार योजनेंतर्गत अनुदान मिळण्याबाबत

**(१०) * ४७६५० डॉ.वजाहत मिर्झा, श्री.शरद रणपिसे, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.आनंदराव पाटील, श्री.रामहरी रुपनवर, अॅड.हुस्नबानू खलिफे, डॉ.सुधीर तांबे, श्री.हरिसिंग राठोड :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) यवतमाळ जिल्ह्यातील निराधार वृध्द, अंध, अपंग व्यक्तींना व विधवा, घटस्फोटीत महिलांना संजय गांधी निराधार योजनेंतर्गत मिळणारे अनुदान मागील ४ महिन्यापासून मिळत नसल्याची बाब माहे एप्रिल, २०१९ च्या तिसऱ्या सप्ताहात निदर्शनास आली, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार यवतमाळ जिल्ह्यातील निराधार वृध्द, अंध, अपंग व्यक्ती व विधवा, घटस्फोटीत महिलांना त्यांचे थकीत अनुदान मिळण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. सुरेश (भाऊ) खाडे :** (१) हे खरे नाही.
(२) व (३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## सेंकडरी स्कूल्स एम्प्लॉईज क्रेडिट सोसायटी, मुंबई मधील गैरव्यवहार, अनियमितता व बेकायदेशीर भरतीबाबत

**(११) * ४७०३७ श्री.कपिल पाटील : तारांकित प्रश्न क्रमांक ४४०१५ ला दिनांक २२ नोव्हेंबर, २०१८ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सेंकडरी स्कूल्स एम्प्लॉईज क्रेडिट सोसायटी, मुंबई मधील गैरव्यवहार, अनियमितता व बेकायदेशीर भरतीबाबत संस्थेचे सदस्य सर्वश्री सुभाष मोरे, जालिंदर सरोदे आणि संजय पाटील यांनी सहकार आयुक्तांकडे तक्रार केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, संस्थेबाबत दाखल केलेल्या तक्रार अर्जातील मुद्दयांच्या अनुषंगाने मुद्देनिहाय चौकशी करुन अहवाल सादर करण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार संबंधित दोषींविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.सुभाष देशमुख :** (१) होय.
(२) व (३) सदर पतसंस्थेमधील गैरव्यवहार, अनियमितता आणि बेकायदेशीर भरती इ. बाबत संस्थेच्या संचालकांनी केलेल्या तक्रारीच्या अनुषंगाने महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० चे कलम ८१ अन्वये चाचणी लेखापरिक्षण करणेसाठी श्री.आर.एस. शिर्के, सहनिबंधक, सहकारी संस्था (लेखापरिक्षण) यांची दिनांक २०/१०/२०१८ रोजीच्या आदेशान्वये नियुक्ती करण्यात आली आहे. याशिवाय मा.आ.श्री.कपिल पाटील व संचालकांनी संस्थेबाबत दाखल केलेल्या तक्रार अर्जातील मुद्दयांच्या अनुषंगाने सखोल मुद्देनिहाय चौकशी करुन अहवाल सादर करणेबाबत विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था, मुंबई यांना दिनांक २३/१०/२०१८ रोजीच्या पत्रान्वये कळविण्यात आले आहे.

मा.आ.श्री.कपिल पाटील व इतर संचालक यांच्या विनंतीच्या अनुषंगाने सहकार आयुक्तांनी उपरोक्त मुद्दयांबाबत बैठक घेऊन चाचणी लेखापरिक्षणातील मुद्दे व तक्रारदारांच्या अर्जातील प्रशासकीय कार्यवाहीचे मुद्दे वेगळे तपासण्याच्या सूचना दिल्या. त्यानुसार संचालकांच्या तक्रार अर्जामधील प्रशासकीय मुद्दयांबाबत चौकशी करण्यासाठी सहकार आयुक्तांनी दिनांक २८/०२/२०१९ रोजीच्या पत्रान्वये उपनिबंधक एम विभाग, मुंबई-२ यांची नियुक्ती केली आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यातील सर्व बाजार समितीमधील तूर खरेदी बंद असल्याबाबत

**(१२) * ४६५२८ श्री.हेमंत टकले, श्री.धनंजय मुंडे, श्री.किरण पावसकर, श्री.आनंद ठाकूर, ॲड.राहुल नार्वेकर, श्री.विक्रम काळे, श्री.सतिश चव्हाण, श्रीमती विद्या चव्हाण, श्री.अनिकेत तटकरे, श्री.जगन्नाथ शिंदे, श्री.रामराव वडकुते, श्री.ख्वाजा बेग, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.अनिल भोसले : तारांकित प्रश्न क्रमांक ४४०१३ ला दिनांक २२ नोव्हेंबर, २०१८ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **पणन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शेतकऱ्यांकडून तूर खरेदी करण्याचा निर्णय शासनाने माहे मार्च, २०१९ मध्ये वा त्यादरम्यान घेऊन तूरीला प्रतिक्विंटल ५६७५ रुपये हमी भाव जाहीर केला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, नाफेडमार्फत तूर विक्री करता यावी, याकरीता शेतकऱ्यांनी हंगामाचे पेरीव पत्र, बँक पास बुक व आधार कार्ड देऊन नोंदणी केली, परंतु राज्यातील सर्व बाजार समितीमध्ये स्थायी, अस्थायी व हंगामी कर्मचाऱ्यांनी आंदोलन पुकारल्यामुळे तूर खरेदी बंद आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन शेतकऱ्यांकडे असलेली तूर खरेदी करण्याबाबत कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. राम शिंदे :** (१) होय.

(२) व (३) राज्यातील ३०७ कृषी उत्पन्न बाजार समित्यामधील कर्मचाऱ्यांना शासकीय सेवेत सामावून घेण्याबाबत बाजार समित्यांनी दिनांक २८/२/२०१९ पासून बंद पुकारलेला होता. सदर बंद दिनांक १/३/२०१९ रोजी मागे घेण्यात आलेला आहे.

राज्यात हमीभावाने तूर खरेदी करण्यासाठी दिनांक १७/१/२०१९ पासून ऑनलाईन नोंदणी सुरु करण्यात आली होती आणि प्रत्यक्ष खरेदी दिनांक ७/२/२०१९ पासून सुरु करण्यात आलेली होती. खरेदीच्या एकूण कालावधीत एकूण ५४६२७ शेतकऱ्यांकडून ५३९८९९.४१ क्विंटल तूरीची खरेदी करण्यात आली आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## आदिवासी विकास विभागाकडून फर्निचर खरेदी निविदेमध्ये गैरव्यवहार झाल्याबाबत

**(१३) * ४६५९१ श्री.धनंजय मुंडे, श्री.अनिकेत तटकरे, श्रीमती विद्या चव्हाण, श्री.ख्वाजा बेग, श्री.विक्रम काळे, श्री.सतिश चव्हाण, श्री.जगन्नाथ शिंदे, श्री.किरण पावसकर :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) आदिवासी विकास विभागाकडून दिनांक ७ फेब्रुवारी, २०१९ रोजी वा त्यासुमारास प्रसिध्द करण्यात आलेल्या सुमारे ३२५ कोटीच्या फर्निचर खरेदीच्या निविदा प्रक्रियेमध्ये झालेल्या गैरव्यवहारासंदर्भात लोकप्रतिनिधीकडून विभागास माहे मार्च, २०१९ मध्ये वा त्यादरम्यान पत्रव्यवहार करण्यात आला असून यासंदर्भात विभागाकडे मागण्यात आलेली माहिती देण्यात आली नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर निविदा प्रक्रियेमध्ये उद्योग, ऊर्जा व कामगार विभागाच्या शासन निर्णय, क्रमांक भांखस-२०१४/प्र.क्र.८२/भाग-III/उद्योग-४ मधील तरतुदीचे उल्लंघन करुन ठराविक निविदाकारांच्या निविदा मंजूर करण्यात आलेल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या निविदा प्रक्रियेतील अटी व शर्ती एक ठराविक निविदाकार लक्षात ठेवून तयार करण्यात आल्या असून एकाच वस्तुची खरेदी वेगळ्या दराने करणे, निविदा प्रक्रियेचे पूर्णत: उल्लंघन होणे अशी अनियमितता या निविदा प्रक्रियेत झाली असल्याने सदर निविदा प्रक्रिया रद्द करण्यात येणार आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन संबंधित दोषींविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. अशोक उईके :** (१) हे खरे नाही.

विभागाकडून पत्र क्र. व्हीआयपी-२०१९/प्र.क्र.१४४/का.१३, दिनांक ०९ मे, २०१९ अन्वये माहिती देण्यात आली आहे.

(२) हे खरे नाही.

संबंधित शासन निर्णयातील तरतुदींचे उल्लंघन झालेले नाही.
(३) सदर निविदा प्रक्रिया GeM पोर्टलद्वारे (ऑनलाईन) विहित प्रक्रियेनुसार पार पाडण्यात आलेली आहे. निविदा पारदर्शकपणे व खरेदी धोरणातील तरतुदीस अनुसरुन पार पाडण्यात आलेल्या असून सदर खरेदी प्रक्रियेसंदर्भात उद्योग विभागानेही सहमती दर्शविलेली आहे. सदर प्रक्रियेत कोणत्याही प्रकारची अनियमितता झालेली नाही. तसेच या प्रक्रियेबाबत काही लोकांनी मा.उच्च न्यायालयात याचिका दाखल केली असता न्यायालयाने कोणत्याही प्रकारची स्थगिती देण्यास नकार देऊन रिट याचिका क्र. २४३६/२०१९ यावर दिनांक ११/०४/२०१९ रोजीच्या आदेशान्वये मा.उच्च न्यायालयाने निविदा प्रक्रिया पुढे चालू ठेवण्याचा निर्णय दिलेला आहे. त्यामुळे सदर निविदा प्रक्रिया रद्द करण्याचा प्रश्न उद्भवत नाही.
(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांचे आंतरराष्ट्रीय दर्जाचे स्मारक उभारण्याबाबत

**(१४) * ४७९५० श्री.प्रकाश गजभिये, श्री.हेमंत टकले, श्री.धनंजय मुंडे, श्री.किरण पावसकर, श्री.आनंद ठाकूर, ॲड.राहुल नार्वेकर, श्री.विक्रम काळे, श्री.सतिश चव्हाण, श्रीमती विद्या चव्हाण, श्री.अनिकेत तटकरे, श्री.जगन्नाथ शिंदे, श्री.रामराव वडकुते, श्री.अमरिशभाई पटेल, श्री.रामहरी रुपनवर : दिनांक २९ नोव्हेंबर, २०१८ रोजी सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आलेल्या अतारांकित प्रश्नोत्तरांच्या यादी क्रमांक ५ मधील प्रश्न क्रमांक ३६३२९ ला दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) लोकशाहीर अण्णा भाऊ साठे यांचे आंतरराष्ट्रीय दर्जाचे स्मारक शासनाच्या अनास्थेमुळे प्रत्यक्षात येण्यापुर्वीच अडचणीत आले असून या स्मारकाचे कामकाज मार्गी लावण्याकरीता गोवंडी, मुंबई येथे भाडेतत्वावर घेण्यात आलेले सुसज्ज कार्यालय भाडे थकल्याने बंद करण्यात आल्याचे दिनांक २७ मार्च, २०१९ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अण्णाभाऊ साठे यांचे निवासस्थान असलेल्या घाटकोपरच्या चिरागनगर येथे स्मारक उभारण्याचा निर्णय शासनाने माहे सप्टेंबर, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान घेतला असून यासाठी ३०० कोटींपेक्षा अधिक खर्च अपेक्षित आहे याकरीता माहे एप्रिल, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान गोवंडीच्या अर्जुन सेंटरमध्ये समितीच्या १९ कर्मचाऱ्यांसहित कार्यालय सुरु करण्यात आले, मात्र कामावर हजर झाल्यापासून या कर्मचाऱ्यांना वेतनही मिळाले नाही तसेच शासनाकडून निधीच मिळत नसल्याने या कार्यालयातील फर्निचर, लेखन साहित्य, वीज, दूरध्वनीची बिले थकीत असून चार महिन्यापासून कार्यालयाचे भाडेही थकले असल्याने कार्यालयाला टाळे ठोकल्याने कर्मचारी कार्यालयाबाहेर बसुन कामे करीत आहेत, याबाबत वारंवार शासनाशी पत्रव्यवहार करुनही याबाबत शासन आवश्यक कार्यवाही करीत नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन लोकशाहीर अण्णा भाऊ साठे यांचे आंतरराष्ट्रीय दर्जाचे स्मारक उभारण्यासाठी निधी देण्याबाबत कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. सुरेश (भाऊ) खाडे :** (१) नाही.

(२) नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## परभणी जिल्ह्यातील ऊर्जा विकासाची कामे प्रलंबित असल्याबाबत

**(१५) * ४६९६६ श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.धनंजय मुंडे, श्री.सतिश चव्हाण, श्री.विक्रम काळे :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) परभणी जिल्ह्यात दिनदयाल उपाध्याय ग्रामज्योती योजना, एचडीव्हीएस, एकात्मिक ऊर्जा व विकास प्रकल्प १ व २, पायाभुत आराखडा १ व २ व इतर योजनेमार्फत करण्यात येणारी ऊर्जा विकासाची कामे कंत्राटदार व

अधिकारी यांच्या अकार्यक्षमतेमुळे माहे मार्च, २०१९ अखेरही पूर्ण होऊ शकलेली नाहीत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, कंत्राटदारांना निविदेतील अटीप्रमाणे सदरील कामे विहित मुदतीत पूर्ण करणे बंधनकारक असताना त्यांनी ती पूर्ण न केल्याने त्यांच्याविरूध्द कोणती कार्यवाही करण्यात आली आहे, तसेच या कामी दुर्लक्ष करणाऱ्या कनिष्ठ व वरिष्ठ अधिकाऱ्यांची चौकशी करून त्यांच्यावर कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.चंद्रशेखर बावनकुळे :** (१) हे खरे नाही. परभणी जिल्ह्यात विविध योजनेंतर्गत ३४ नवीन उपकेंद्र, १८ अतिरिक्त विद्युत रोहित्र, १०७० कि.मी. उच्चदाब वाहिनी, ३५० कि.मी. लघुदाब वाहिनी व १४३४ वितरण रोहित्रे महावितरण कंपनीमार्फत कार्यान्वित करण्यात आली आहेत व उर्वरित कामे प्रगतीपथावर आहेत.
(२) विहित वेळेत कामाचे उदिष्ट पूर्ण न करणाऱ्या कंत्राटदारांना महावितरण कंपनीमार्फत नोटीस टू करेक्ट तसेच दंडात्मक कारवाई करण्यात आली आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## आदिवासी विकास प्रकल्पांतर्गत जव्हार (जि.पालघर) येथील योजनांमध्ये गैरव्यवहार झाल्याबाबत

**(१६) * ४६७१७ श्री.जगन्नाथ शिंदे, श्री.आनंद ठाकूर, श्री.रामहरी रुपनवर, श्री.शरद रणपिसे, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.अमरनाथ राजूरकर, डॉ.सुधीर तांबे, ॲड.हुस्नबानू खलिफे, डॉ.वजाहत मिर्झा, श्री.हरिसिंग राठोड, श्री.मोहनराव कदम, श्री.आनंदराव पाटील, श्री.रविंद्र फाटक, श्री.नागोराव गाणार, प्रा.अनिल सोले, श्री.प्रविण दरेकर, प्रा.जोगेन्द्र कवाडे, श्री.गिरीशचंद्र व्यास, आर्कि.अनंत गाडगीळ, श्री.जयंत पाटील : तारांकित प्रश्न क्रमांक ४२५११ ला दिनांक १७ जुलै, २०१८ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जव्हार आदिवासी विकास प्रकल्पांतर्गत मोखाडा, जव्हार, विक्रमगड व वाडा या ४ तालुक्यांचा समावेश असून आदिवासींच्या विकासासाठी जव्हार (जि.पालघर) येथे एकात्मिक आदिवासी विकास विभागात सन २००६ ते सन २०१० या कालावधीत प्रकल्प अधिकारी यांनी कन्यादान योजना, घरकुल योजना, स्वयंरोजगार योजना, दुधाळ जनावरे वाटप योजना, संगणक प्रशिक्षण योजना, इंग्लिश स्पीकिंग कोर्स, महिलांना देण्यात येणाऱ्या शिलाई मशीन व घरकुल या योजनांमध्ये कोटयवधी रुपयांचा गैरव्यवहार केल्याचे माहे एप्रिल, २०१९ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, जव्हार एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्पांतर्गत दुर्गम भागातील रहिवाशांसाठी राबविण्यात आलेल्या अनेक योजनात आय.एन.खाटिक यांनी त्यांच्या कार्यकाळात विविध संस्था व साहित्य पुरवठादार ठेकेदारांच्या संगनमताने कोट्यवधी रुपयांचा गैरव्यवहार केल्याचा आक्षेप न्या.गायकवाड समितीने घेतला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, न्या.गायकवाड समितीने आपल्या अहवालात आक्षेप घेतलेल्या दोषींविरोधात शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. अशोक उईके :** (१) होय.

न्या.गायकवाड समितीने सादर केलेल्या चौकशी अहवालानुसार गैरव्यवहार झाल्याचे निदर्शनास आले आहे.

(२) होय.

न्या.गायकवाड समितीने सादर केलेल्या चौकशी अहवालामध्ये श्री.आय.एन.खाटीक, तत्कालीन प्रकल्प अधिकारी यांच्या नावाचा समावेश आहे.

(३) न्या.गायकवाड समितीच्या अहवालातील दोषी आढळून आलेल्या अधिकारी/कर्मचारी यांच्यावर पोलीस ठाणे, जव्हार, जि.पालघर येथे तक्रारी दाखल करण्यात आल्या आहेत. त्यावर पोलीस ठाणे, जव्हार यांच्यामार्फत पुढील तपास चालू आहे. तसेच, दोषी अधिकारी/कर्मचाऱ्यांविरुध्द विभागीय चौकशीची कार्यवाही सुध्दा प्रस्तावित करण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यातील मराठी, उर्दू व हिंदी माध्यमाच्या शाळांना निवासी दराने वीज पुरवठा करणेबाबत

**(१७) * ४६६९५ श्री.विक्रम काळे, डॉ.सुधीर तांबे, श्री.सतिश चव्हाण, श्री.बाळाराम पाटील, श्री.दत्तात्रय सावंत : तारांकित प्रश्न क्रमांक ४१२७५ ला दिनांक १० जुलै, २०१८ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील मराठी, उर्दू व हिंदी माध्यमाच्या विनाअनुदानित व अनुदानित सर्व शाळांना निवासी दराने वीज पुरवठा करण्यात येत नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्य विद्युत नियामक आयोगाने निर्धारित केलेल्या कोणत्या सार्वजनिक सेवा व अन्य वर्गवारीनुसार वीज आकारणीचे दर काय आहेत,

(३) असल्यास, सदर शाळांना निवासी दराने वीज पुरवठा करण्यासाठी कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.चंद्रशेखर बावनकुळे :** (१) हे खरे आहे. महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगास विविध वर्गवारी व त्या अंतर्गत वीज दर निश्चित करण्याचे अधिकार आहेत.

(२) महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगाने निर्धारित केलेल्या वर्गवारी "लघुदाब-१०(अ)-सार्वजनिक सेवा-शासकीय शैक्षणिक संस्था व रुग्णालये" व "लघुदाब-१०(ब)-सार्वजनिक सेवा-अन्य" यांचेकरीता, शुन्य ते २०० युनिट करीता अनुक्रमे रुपये ४.२८ प्रति युनिट व रुपये ५.५३ प्रति युनिट, २०० युनिट पेक्षा जास्त वापराकरीता अनुक्रमे रुपये ५.४८ व रुपये ८.१८ प्रति युनिट, २० ते ५० किलोवॅट विद्युतभाराकरीता अनुक्रमे रुपये ५.५८ व रुपये ८.०८ प्रति युनिट तर ५० किलोवॅट पेक्षा जास्त विद्युतभाराकरीता अनुक्रमे रुपये ६.६८ व रुपये ८.४८ प्रति युनिट इतका वीज दर निर्धारित करण्यात आला आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यातील शेतकऱ्यांच्या कृषीपंपांना उच्चदाब वीज जोडणी देणारी योजना राबविण्याबाबत

**(१८) * ४७६२५ श्री.बाळाराम पाटील, श्री.जयंत पाटील : तारांकित प्रश्न क्रमांक ४४१६७ ला दिनांक २२ नोव्हेंबर, २०१८ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील कृषीपंपांना उच्चदाब वीज जोडणी देणारी योजना शासनाने सुरु केली असल्याचे माहे मार्च, २०१९ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले असून महावितरण कंपनीने बाजारभावापेक्षा कमी दर ठरविल्याने कंत्राटदारांनी निविदा प्रक्रियेवरच बहिष्कार टाकला आहे तसेच दीड वर्षात यामधून मार्ग न काढल्याने राज्यातील लाखो शेतकरी उच्चदाब वीज जोडणीपासून वंचित राहिले आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, रायगड जिल्ह्यातील २५३ शेतकऱ्यांनी माहे मार्च, २०१९ अखेरपर्यंत कृषीपंप वीज जोडणीसाठी ऑनलाईन अर्ज व आगाऊ रक्कम भरुनही त्यांना वीज जोडणी मिळालेली नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी कृषीपंप वीज जोडणीसाठी ऑनलाईन पध्दतीने अर्ज स्वीकारुन कार्यवाही करीत असली तरीही जून महिन्याच्या पहिल्या आठवड्यात मॉन्सूनचा पाऊस सुरु होणार असून वीज जोडणी मिळण्याची शक्यता नाही, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन सदरहू विलंबाबाबत संबंधित अधिकारी व ठेकेदार यांच्यावर जबाबदारी निश्चित करून संबंधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे तसेच कृषीपंप वीज जोडणीकरीता आगाऊ पैसे भरलेल्या सर्व शेतकऱ्यांना विनाविलंब वीज जोडणी देण्याच्यादृष्टीने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.चंद्रशेखर बावनकुळे :** (१) हे खरे नाही.

शासन निर्णय, दिनांक ५ मे, २०१८ नुसार दिनांक ३१/०३/२०१८ पर्यंत पैसे भरुन प्रलंबित असणाऱ्या २,२४,७८५ अर्जदारांकरीता उच्चदाब वितरण प्रणाली योजना दिनांक १६/१०/२०१८ पासून महावितरण कंपनीमार्फत

कार्यान्वित करण्यात येऊन ती प्रभावीपणे राबविण्यासाठी अंशत: व संपूर्ण टर्नकी निविदेंतर्गत ६४६ कार्यादेश विविध कंत्राटरादारांना देण्यात आले आहेत. सद्य:स्थितीत दिनांक ११/०६/२०१९ पर्यंत ६९०४ इतक्या अर्जदारांना उच्चदाब वितरण प्रणाली योजनेंतर्गत वीज जोडणी देण्यात आली आहे.

(२) हे खरे नाही. रायगड जिल्हयातील पेण मंडळांतर्गत दिनांक ३१/०३/२०१८ अखेर २२८ प्रलंबित अर्जदार असून आजतागायत ३९ अर्जदारांना उच्चदाब वितरण प्रणाली योजनेमधून वीज जोडण्या देण्यात आल्या असून उर्वरित कृषीपंप ग्राहकांना वीज जोडणी देण्याचे काम प्रगतीपथावर आहे.

महावितरणद्वारे शेतकऱ्यांना दिवसा सिंचन करणे शक्य व्हावे, या प्रमुख उद्दीष्टाकरीता राज्यात पारेषणविरहीत सौर कृषीपंप उपलब्ध करण्यासाठी “मुख्यमंत्री सौर कृषी पंप योजना” राबविण्यात येत आहे.

(३) हे खरे नाही. कृषीपंपाना उच्चदाब वितरण प्रणाली योजनेमधून वीज जोडण्या देण्याची कामे प्रगतीपथावर असून माहे जून, २०१९ अखेर ३९ वीज जोडण्या देण्यात आल्या आहेत.

(४) रायगड जिल्हयातील पेण मंडळांतर्गत मार्च २०१८ अखेर पैसे भरुन प्रलंबित असलेल्या २२८ शेतीपंप अर्जदारांपैकी ९७ अर्जदारांना उच्चदाब वितरण प्रणाली (HVDS) व इतर योजनेंतर्गत वीज जोडण्या देण्यात आलेल्या आहेत, उर्वरीत अर्जदारांना वीज जोडण्या देण्याचे काम प्रगतीपथावर आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## गांध्रे-ठाकरेपाडा (ता.वाडा, जि.पालघर) रस्त्याच्या कामामध्ये गैरव्यवहार झाल्याबाबत

**(१९) * ४६८२२ श्री.आनंद ठाकूर, श्री.धनंजय मुंडे, श्री.हेमंत टकले, ॲड.राहुल नार्वेकर, श्री.किरण पावसकर, श्री.ख्वाजा बेग :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गांध्रे (ता.वाडा, जि.पालघर) गावातील गांध्रे-ठाकरेपाडा रस्त्याच्या नावाने सुमारे १९ लाख ३१ हजार रक्कमेची बोगस बिले काढून गैरव्यवहार केल्याची बाब माहे डिसेंबर २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, स्थानिक ग्रामस्थांनी जिल्हाधिकारी, पालघर यांच्याकडे तक्रार करुन चौकशीची मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, त्यानुषंगाने दोषी अधिकारी व ठेकेदार यांच्यावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. अशोक उईके :** (१), (२) व (३) ठक्कर बाप्पा आदिवासी वस्ती सुधार योजनेंतर्गत सन २०१२-१३ व २०१४-१५ मध्ये मौजे गांध्रे (ता.वाडा, जि.पालघर) गावातील गांध्रे-ठाकरेपाडा रस्त्याचे डांबरीकरण व कॉंक्रिटीकरण न करता देयके (रुपये १९,३१,६७६/-) अदा करुन अपहार केल्याची बाब आय.आय.टी., मुंबई यांच्या अहवालातील पृ.क्र. १९१, १९२ व १९३ नुसार निष्पन्न होत असल्याची तक्रार श्री.शरद यशवंत पाटील यांनी जिल्हाधिकारी, पालघर यांच्याकडे करुन चौकशीची मागणी केली होती. त्यानुसार सदर प्रकरणी प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, जव्हार यांनी तहसिलदार वाडा यांचे पथक नेमून चौकशी केली आहे. सदर चौकशीत गांध्रे-ठाकरेपाडा रस्त्याचे काम झालेले नसल्याचे त्यांच्या अहवालात नमूद करण्यात आले आहे.

तथापि, उपरोक्त तक्रार आय.आय.टी., मुंबई यांनी गांध्रे गावात केलेल्या तपासणीचे अनुषंगाने आहे. तद्नुषंगाने नमूद करण्यात येते, की जिल्हाधिकारी, पालघर यांनी त्यांच्या दिनांक २२/३/२०१६ च्या आदेशान्वये जव्हार प्रकल्पांतर्गत सन २०१२-१३ ते सन २०१४-१५ या कालावधीत झालेल्या कामांचे आय.आय.टी., मुंबई यांच्या मार्फत सामाजिक अंकेक्षण करण्याचा निर्णय घेतला. त्यानुसार गांध्रे गावातील ठाकरेपाडा येथे दिनांक ३१/०५/२०१८ रोजी केलेल्या तपासणीत सिमेंट रस्ता (रुपये ९,९९,६५४/-) व डांबरी रस्ता (रुपये ९,३२,०२२/-) ही कामे झाली नसल्याचे दिनांक ९ जुलै, २०१८ रोजी सादर केलेल्या अहवालात नमुद केले आहे. मात्र प्रकल्प कार्यालयातील दस्तऐवजांची पडताळणी केली असता सदर कामे ठाकरे पाडा येथे मंजूर नसून ठाणगेपाडा येथे मंजूर असल्याचे दिसून आले. यास्तव आय.आय.टी. ने गांध्रे गावातील कामांचे संबंधित यंत्रणेच्या अधिकाऱ्यांच्या उपस्थितीत दिनांक ३०/०१/२०१९ रोजी पुन:तपासणी केली तेव्हा सदर दोन्हीही कामे ठाणगे पाडा

येथे आढळून आलेली आहेत. सदर कामे मंजूर ठिकाणी ठाणगेपाडा येथे प्रत्यक्षात जागेवर आढळून आलेली असल्याने प्रकरणी संबंधितांवर कारवाई करण्याची आवश्यकता नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## आश्रमशाळांमधील प्राथमिक शिक्षकांकडे तत्सम पदांचा प्रभार न सोपविण्याबाबत

**(२०) * ४७५८० श्री.श्रीकांत देशपांडे :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शासकीय आश्रमशाळांमधील अधीक्षक, अधीक्षीका, गृहपाल हे पद निवृत्ती/निलंबन/दिर्घ रजा/प्रसुती किंवा अन्य कारणास्तव उपलब्ध नसणे अथवा रिक्त असल्यास त्या पदाचा प्रभार/प्रतिनियुक्ती शिक्षकांना दिला जातो, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, प्रकल्पस्तरावर दिल्या जाणाऱ्या अशा प्रभार व प्रतिनियुक्तीमुळे शिक्षकांकडील अध्यापनाचे कामात बाधा निर्माण होते, त्यास पर्यायी व्यवस्था उपलब्ध नसल्याने सदर काळातील शैक्षणिक नुकसानास कोण जबाबदार आहे तसेच असे प्रभार/प्रतिनियुक्तीमुळे शासकीय आश्रमशाळांमध्ये बालकांच्या सक्तीच्या व मोफत शिक्षणाचा अधिकार अधिनियमातील तरतुदी व ध्येयधोरणांचे उल्लंघन व दुर्लक्ष होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शिक्षकांना अधीक्षक, गृहपाल इत्यादी पदांचा प्रभार देतांना असमान संवर्गाशी निगडीत कामे, प्रभार देण्याची कार्यवाही नियमानुसार योग्य आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार जबाबदार अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. अशोक उईके :** (१) अंशत: खरे आहे.

(२) व (३) अधीक्षक व अधिक्षीका यांना साप्ताहिक सुटी मंजूर करण्यात आलेली आहे. तसेच त्यांचे रजेच्या कालावधीमध्ये अत्यंत तात्पुरत्या स्वरुपात आश्रमशाळेतील शिक्षक/शिक्षिकेकडे अतिरिक्त कार्यभार सोपविण्यात येतो. विद्यार्थी/विद्यार्थीनीचे सुरक्षिततेसाठी सदर बाब अत्यंत आवश्यक आहे. आवश्यकतेनुसार सदर शिक्षकाच्या विषयासाठी तासिका तत्वावर उमेदवाराची नेमणूक करण्यात येते. सदर कार्यभारामुळे आश्रमशाळेतील विद्यार्थ्यांचे कोणत्याही प्रकारचे शैक्षणिक नुकसान होत नाही.

(४) विभागांतर्गत सर्व कार्यालयांना प्रतिनियुक्तीने देण्यात आलेले आदेश रद्द करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. अधीक्षक/गृहपाल यांची रिक्त पदे भरण्याची कार्यवाही सुरू आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## आदिवासी विभागाने राज्यातील आश्रमशाळा बंद केल्याबाबत

**(२१) * ४७४१८ श्री.दत्तात्रय सावंत, श्री.बाळाराम पाटील, श्री.विक्रम काळे, डॉ.सुधीर तांबे, श्री.रमेशदादा पाटील, श्री.निलय नाईक, श्री.प्रविण दरेकर :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) आदिवासी उपयोजना क्षेत्राबाहेरील आदिवासी आश्रमशाळा आदिवासी विभागाने दिनांक २३ जानेवारी, २०१९ रोजी वा त्यासुमारास शासन आदेश निर्गमित करून कोल्हापूर जिल्हयातील २, पुणे जिल्हयातील २, सातारा जिल्हयातील २, रत्नागिरी जिल्हयातील २ शाळा बंद केल्या असून पुणे जिल्हयातील (ता.भोर) सन १९७२ रोजी सुरु करण्यात आलेली पांगारी व कुरुंजी येथील डोंगराळ व दुर्गम भागातील आश्रमशाळा शासनाने बंद करण्याचा निर्णय घेतल्याचे माहे मे, २०१९ च्या प्रथम सप्ताहात निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर आश्रमशाळांच्या ५ ते २० कि.मी. अंतरापर्यंत एकही शाळा नसल्याने या दुर्गम भागातील विद्यार्थी शिक्षणापासून वंचित राहण्याची परिस्थिती निर्माण झाली आहे, हे ही खरे आहे काय.

(३) असल्यास, सदर भागात अनेक आदिवासी विद्यार्थी असून या आदिवासी विद्यार्थ्यांना शाळेतून मिळत असणाऱ्या सुविधा इतर शाळेत मिळत नसल्यामुळे उक्त शाळा पुन्हा सुरू करण्याबाबत स्थानिक नागरिक व लोकप्रतिनिधींकडून मागणी केली जात आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन बंद केलेल्या आश्रमशाळा पुन्हा सुरू करणेबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. अशोक उईके :** (१) हे खरे आहे.

(२) हे खरे नाही.

(३) हे खरे आहे.

(४) कोल्हापूर, पुणे, सातारा व रत्नागिरी जिल्ह्यातील आदिवासी उपयोजना क्षेत्राबाहेरील भागात आदिवासी जमातीची लोकवस्ती फारच कमी आहे. सदर भागातील ८ आश्रमशाळांमध्ये निवासी आदिवासी विद्यार्थी उपलब्ध होत नसल्याने निवासी आदिवासी विद्यार्थी क्षमता पूर्णपणे भरली जात नाही. तसेच आदिवासी उपयोजनेच्या मार्गदर्शक सूचनानुसार अन्य जमातीच्या विद्यार्थ्यांना आदिवासी उपयोजना निधी खर्च करता येत नाही. त्यामुळे शासन निर्णय, दिनांक २३ जानेवारी, २०१९ अनुसार आश्रमशाळा बंद करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

तथापि, सदर आश्रमशाळांमधील अनुसूचित जाती तसेच विमुक्त जाती व भटक्या जमातीच्या विद्यार्थ्यांची संख्या विचारात घेता विमुक्त जाती व भटक्या जमाती विभागाने या शाळा त्यांच्या निधीतून सुरु करण्याबाबत विचार करण्याची विनंती विमुक्त जाती व भटक्या जमाती तसेच सामाजिक न्याय (VJNT/SBC) विभागास करण्यात आली होती. परंतु, त्या दोन्ही विभागांनी सदर आश्रमशाळा सुरू ठेवण्याबाबतचा निर्णय न घेतल्यामुळे संबंधित गावातील ग्रामस्थ व लोकप्रतिनिधी यांची मागणी लक्षात घेऊन विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होऊ नये म्हणून सदर आश्रमशाळा बंद करण्याच्या निर्णयास एक वर्षाची स्थगिती देण्यात आली आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## साखर कारखान्यांना एफआरपीचे पैसे मिळण्याबाबत

**(२२) * ४६८११ श्री.रामहरी रुपनवर, ॲड.हुस्नबानू खलिफे, श्री.शरद रणपिसे, श्री.नागोराव गाणार, प्रा.अनिल सोले, श्री.गिरीशचंद्र व्यास, श्री.प्रविण दरेकर, श्री.रामदास आंबटकर : तारांकित प्रश्न क्रमांक ४०९४७ ला दिनांक १९ मार्च, २०१८ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात मागील हंगामात १९५ साखर कारखान्यांनी ९४०.६१ लाख मेट्रीक टन ऊसाचे गाळप केले असून ऊस घातल्यापासून १४ दिवसात पैसे देणे बंधनकारक असतानाही हंगाम संपून दोन महिने झाले असूनही एफआरपीचे पैसे कारखान्यांकडून मिळालेले नसल्याने सध्या राज्यातील १६१ कारखान्यांकडे चार हजार कोटी रुपयांची एफआरपी प्रलंबित असल्याचे दिनांक १९ एप्रिल, २०१९ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले असून राज्यात साखरेच्या किमान किंमतीत वाढ केल्यामुळे शासनाकडून मिळणाऱ्या अनुदानाची रक्कम वजा करून उपलब्धतेनुसार ऊस उत्पादक शेतकऱ्यांना एफआरपीची रक्कम देण्याचा निर्णय कोल्हापूर येथे साखर कारखानदाराच्या बैठकीत घेण्यात आला, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, साखरेच्या किमान किंमतीपेक्षा एफआरपीची रक्कम अधिक असल्यामुळे साखर कारखानदार ऊस उत्पादक शेतकऱ्यांना एफआरपीची रक्कम देऊ शकत नसुन सदरहू एफआरपीची रक्कम ऊस उत्पादक शेतकऱ्यांच्या खात्यावर कधीपर्यंत जमा होणार आहे,

(३) असल्यास, साखरेला मागणी नाही, वीज निर्मितीचे पैसे वेळेत मिळत नाही, बँकाकडून पुरेशा प्रमाणात कर्ज मिळत नाही इत्यादी कारणे साखर कारखानदार देत असून, वास्तविक कर्जमाफीची प्रतिक्षा, दुष्काळामुळे पाण्याअभावी शेतजमीन ओसाड, मशागतीसाठी पैसे नसणे, बँकाकडून कर्ज न मिळणे आणि आता एफआरपीची प्रतिक्षा यासह अन्य कारणांमुळे राज्यातील शेतकरी हतबल झाला आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.सुभाष देशमुख :** (१) अंशत: खरे आहे.

हंगाम २०१८-१९ मध्ये १०२ सहकारी व ९३ खाजगी असे १९५ साखर कारखान्यांनी दिनांक १५/०४/२०१९ अखेर ९४०.६१ लाख मे.टन ऊसाचे गाळप केले आहे. सदर ऊसाचे देय FRP प्रमाणे १६१ कारखान्यांकडे रुपये ४३२४.४० कोटी रक्कम थकीत होते. दिनांक ३१/०५/२०१९ अखेर १०२ कारखान्यांकडे रुपये १४२८.१३ कोटी थकीत आहेत.

साखर आयुक्त कार्यालयाने कोल्हापूर येथे ऊस उत्पादक शेतकऱ्यांना FRP देण्याबाबत साखर कारखानदारांसोबत १९ एप्रिल, २०१९ दरम्यान बैठक घेतलेली नाही.

(२), (३) व (४) हंगाम २०१८-१९ मधील थकीत FRP अदा करणेसाठी केंद्र शासनाने बफर स्टॉक सबसिडी, साखर निर्यात अनुदान योजना व सॉफ्ट लोन २०१९ ह्या योजना जाहीर केलेल्या आहेत. सदर योजनांमुळे कारखान्यांना शेतकऱ्यांची FRP प्रमाणे देयके अदा करणे सुलभ होणार आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## जव्हार, मोखाडा, विक्रमगड आणि वाडा तालुक्यातील (जि.पालघर) आश्रमशाळामध्ये पोषण आहाराचा पुरवठा होत नसल्याबाबत

**(२३) * ४६६२९ श्री.जयंत पाटील, श्रीमती विद्या चव्हाण, श्री.आनंद ठाकूर : तारांकित प्रश्न क्रमांक ४६३८९ ला दिनांक २९ नोव्हेंबर, २०१८ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जव्हार, मोखाडा, विक्रमगड आणि वाडा तालुक्यातील (जि.पालघर) आदिवासी विकास प्रकल्पांतर्गत ३० शासकीय आश्रमशाळांमध्ये सुमारे १५ हजार ५०० आदिवासी विद्यार्थी निवासी राहून शिक्षण घेत असून उक्त आश्रमशाळांमध्ये दिनांक १२ डिसेंबर, २०१८ पासून ठेकेदाराने अन्नधान्याचा पुरवठा बंद केल्याची बाब श्रमजीवी संघटनेने तसेच 'समर्थन' संस्थेने मा.मंत्री, आदिवासी विकास, सचिव, आदिवासी विकास विभाग तसेच संबंधित जिल्ह्याच्या संबंधित प्रशासनाधिकारी यांच्याकडे माहे जानेवारी, २०१९ मध्ये वा त्यादरम्यान लेखी निवेदनाद्वारे उपस्थित केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर आश्रमशाळेसाठी धान्य पुरवठा करणा-या पारसेवार ॲण्ड कंपनी, नांदेड या ठेकेदाराचा ठेका शासनाने रद्द करून ठेकेदाराला काळ्या यादीत टाकण्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त आश्रमशाळेला ठेकेदाराकडून धान्य पुरवठा होत नसल्यामुळे आदिवासी विकास प्रकल्प अधिकारी तथा सहाय्यक जिल्हाधिकारी यांनी मुख्याध्यापकांना त्यांच्यास्तरावर धान्य खरेदी करण्यास सांगितले असल्यामुळे मुख्याध्यापकांना स्वतः कडील पैसे अथवा उसनवारी करून खर्च करावे लागत असल्यामुळे आश्रमशाळेतील विद्यार्थ्यांना पुरेसा पोषण आहार मिळत नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व आश्रमशाळेतील विद्यार्थ्यांना वेळेवर पोषण आहार मिळण्यासाठी कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. अशोक उईके :** (१) हे खरे आहे.

(२) हे खरे आहे.

(३) व (४) सन २०१८-१९ साठी ई-निविदेव्दारे निश्चित केलेले न्युनतम दराचे पुरवठादार मे.पारसेवार ॲण्ड कंपनी यांनी पुरवठा करण्यास असहमती दर्शविली होती. त्यामुळे मे.पारसेवार ॲण्ड कंपनी या ठेकेदारास काळ्या यादीत टाकण्यात आले. संबंधित शासकीय आश्रमशाळेत गरजेइतके अन्नधान्य, कडधान्य, किराणामाल व मसाले हे स्थानिक पातळीवर बाजारभावापेक्षा जादा दर येणार नाहीत या अटीवर खरेदी करण्याचे तात्पुरते अधिकार मुख्याध्यापक यांना प्रदान करण्यात आले होते. त्याप्रमाणे मुख्याध्यापकांनी स्थानिक पातळीवर अन्नधान्य, कडधान्य व किराणामाल खरेदी करुन मानकाप्रमाणे विद्यार्थ्यांना भोजनपुरवठा केलेला आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## नागपूर येथे बीअर शॉपीच्या आत अवैधरित्या बिअर पिण्याचा गोरखधंदा सुरू असल्याबाबत

**(२४) * ४७५५७ श्री.गिरीशचंद्र व्यास, प्रा.अनिल सोले, श्री.रामदास आंबटकर, श्री.नागोराव गाणार :** सन्माननीय **राज्य उत्पादन शुल्क मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर येथील गोधनी रोडवर बीअर शॉपीच्या आत अवैधरित्या बिअर पिण्याचा गोरखधंदा सुरू असल्याचे उत्पादन शुल्क विभागाने मारलेल्या धाडीत दिनांक २५ एप्रिल, २०१९ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन दोषीवर दंडात्मक कारवाई करुन संबंधित बीअर शॉपीचे लायसेन्स रद्द करण्याबाबत कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.चंद्रशेखर बावनकुळे :** (१) व (२) होय, हे खरे आहे.

निरीक्षक, राज्य उत्पादन शुल्क, ब विभाग, नागपूर यांनी दिनांक २३/०४/२०१९ रोजी झिंगाबाई टाकळी, गोधनी रोड, नागपूर येथील ए-१ बीअर शॉपी, एफएलबीआर-२ अनुज्ञप्ती क्र.२१६-१९-२० या अनुज्ञप्तीस अचानकपणे भेट देऊन निरीक्षण केले असता अनुज्ञप्तीच्या ठिकाणी ग्राहकांना बीअर पिण्याची सोय उपलब्ध केल्याचे निदर्शनास आल्याने अनुज्ञप्तीविरुध्द मुंबई विदेशी नियमावली अंतर्गत नियमभंग प्रकरण नोंदविण्यात आले आहे.

तसेच, नोंदविलेल्या विसंगतीच्या अनुषंगाने अनुज्ञप्तीधारकास कारणे दाखवा नोटीस देऊन खुलासा मागविण्यात आला असता अनुज्ञप्तीधारकाने दिलेले स्पष्टीकरण संयुक्तिक नसल्याचे आढळून आले. त्यामुळे सदर प्रकरणी जिल्हाधिकारी यांच्याकडे सुनावणी घेऊन जिल्हाधिकाऱ्यांच्या अंतिम आदेशानुसार कार्यवाही करण्यात येईल.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## औरंगाबाद चिखलठाणा औद्योगिक परिसरातील माहिती तंत्रज्ञान इमारतीचे भाडे कमी करणेबाबत

**(२५) * ४६९८५ श्री.सतिश चव्हाण, श्री.धनंजय मुंडे, श्री.हेमंत टकले, श्री.विक्रम काळे, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी : तारांकित प्रश्न क्रमांक ४४६९० ला दिनांक २२ नोव्हेंबर, २०१८ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) औरंगाबाद चिखलठाणा औद्योगिक परिसरातील माहिती व तंत्रज्ञान उद्यान इमारतीमध्ये लहान आयटी उद्योग सुरु आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर लहान उद्योजकांना महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाकडून जाचक अटी घालुन दिल्या असून सेवा शुल्क दरात रुपये ०.६५ पैसे प्रति चौ.फुट दरावरुन रुपये ५.५० पैसे प्रति चौ.फुट दरवाढ केलेली असून एमआयडीसीने गाळे भाडे दर रुपये ७.०० प्रति चौ.फुट दरावरुन रुपये ४६ प्रति चौ.फुट तर गाळे विक्रीचा दर रुपये ८०० प्रति चौ.फुट वरुन रुपये २३८६ प्रति चौ.फुट केले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, एमआयडीसीने नाशिक येथील माहिती तंत्रज्ञान इमारती मधील भाडे रुपये १३ प्रति चौ.फुट असे केले असून नाशिक येथील इमारत भाडे दराप्रमाणे औरंगाबाद येथील इमारत भाडे आकारणेसाठी मागणी होत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन अंबड (नाशिक) एमआयडीसी प्रमाणे औरंगाबाद येथील इमारत भाडे पूर्वलक्षी प्रभावाने आकारण्याबाबत काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.सुभाष देसाई :** (१) व (२) होय, हे खरे आहे.

(३) होय, खरे आहे.

(४) चिखलठाणा औद्योगिक क्षेत्रातील माहिती तंत्रज्ञान इमारतीमधील गाळयाचे दर कमी करणेसंदर्भात आयटी उद्योजकांच्या अडचणी सोडविण्यासाठी दिनांक ११/१०/२०१८ रोजी समिती गठित करून सदर समितीने दिनांक १६/१०/२०१८ रोजी आयटी उद्योजक व उद्योग संघटनांचे

प्रतिनिधींसमवेत चर्चा करून समितीने अहवाल सादर केला आहे. त्यानुसार दिनांक २८/१२/२०१८ रोजीच्या संचालक मंडळाच्या बैठकीमध्ये ठराव क्र. ५८२५ मंजूर करण्यात आला असून पुढीलप्रमाणे सुधारित दर मंजूर केले आहेत.
गाळा विक्री दर - रुपये २०१०/-प्रति चौ. फूट.
गाळयांचा मासिक भाडे दर - रुपये २७/-प्रति चौ. फूट प्रति महिना.
गाळयांचे सेवाशुल्क - रुपये ५.५०/- प्रति चौ. फूट प्रति महिना.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## पुणे महावितरण प्रादेशिक कार्यालयातील अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या बदली आदेशात गैरव्यवहार झाल्याबाबत

**(२६) * ४७४७६ श्री.अनिल भोसले :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पुणे महावितरण प्रादेशिक कार्यालयात कार्यरत असलेल्या २५ अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या बदलीचे आदेश मानव संसाधन कार्यालयात कार्यरत असलेल्या व्यवस्थापकांनी आर्थिक व्यवहारातून स्वतःच्या सहीने निर्गमित केले आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, बदलीचे आदेश संगणक प्रणालीव्दारे देणे बंधनकारक असतानाही सदर आदेश कागदोपत्री देण्यात आल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन संबंधित दोषींविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.चंद्रशेखर बावनकुळे :** (१) महावितरण कंपनीच्या पुणे प्रादेशिक कार्यालयांतर्गत कार्यरत १५ अधिकारी / कर्मचारी यांच्या बदलीचे आदेश मानव संसाधन विभागात कार्यरत असलेल्या व्यवस्थापक (मानव संसाधन) यांनी सक्षम अधिकारी यांच्या लेखी मंजुरी शिवाय स्वत:च्या सहीने निर्गमित केले आहेत.

(२) हे खरे नाही.

सदर बदलीचे आदेश संगणक प्रणालीमार्फत निर्गमित करण्यात आलेले आहेत.

(३) व (४) सदर प्रकरणी सक्षम अधिकारी यांच्यामार्फत शिस्तभंगविषयक कार्यवाही सुरु आहे.

-----------------

## पांढरकवडा व पुसद (जि.यवतमाळ) येथील आदिवासी योजना निधीअभावी अपूर्णावस्थेत असल्याबाबत

**(२७) * ४६६७२ श्री.ख्वाजा बेग, श्री.हेमंत टकले, श्री.आनंद ठाकूर, ॲड.राहुल नार्वेकर :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) यवतमाळ जिल्ह्यातील १६ तालुक्यामधील बहुतांश विभाग हा आदिवासी बहुल असून पांढरकवडा एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्पांतर्गत २८ खाजगी, १७ शासकीय आश्रमशाळा व १९ शासकीय आदिवासी वसतिगृहांचा समावेश असून पांढरकवडा व पुसद आदिवासी विकास प्रकल्पांतर्गत राबविल्या जाणाऱ्या योजना ह्या निधीअभावी अपूर्णावस्थेत असल्याचे माहे मार्च, २०१९ च्या शेवटच्या सप्ताहात निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अनेक आश्रमशाळांची अवस्था अतिशय दयनीय असून विद्यार्थ्यांची सुरक्षा धोक्यात आली असल्यामुळे कोटयवधी रुपये खर्च करुन चालविण्यात येणाऱ्या आश्रमशाळांमध्ये नियोजन व शैक्षणिक सुविधे अभावी शासनाचा खर्च निरर्थक ठरत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, यवतमाळ जिल्ह्यात आदिवासी विद्यार्थ्यांसाठी वसतिगृह इमारत नसणे, रोजगाराच्या संधी उपलब्ध नसणे, पुसद प्रकल्पामधील अनेक पदे रिक्त असणे, शाळा व आश्रमशाळांमध्ये सुविधांचा अभाव, विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती मिळत नसून कुपोषण, बालमृत्यू व इतर संसर्गजन्य आजारांमुळे आदिवासी समाज त्रस्त असल्याची बाबही निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. अशोक उईके :** (१) अपर आयुक्त, आदिवासी विकास अमरावती अंतर्गत एकूण ७ प्रकल्प कार्यालये असून त्यापैकी यवतमाळ जिल्हयातील पांढरकवडा व पुसद ही दोन प्रकल्प कार्यालये आहेत.

सदर दोन्ही प्रकल्प कार्यालयांतर्गत निधीच्या अभावामुळे योजना राबविण्यात आल्या नाहीत किंवा अपूर्ण राहिल्या, हे खरे नाही.
(२) हे खरे नाही.

पांढरकवडा व पुसद प्रकल्प कार्यालयांतर्गत एकूण २६ शासकीय आश्रमशाळा असून त्यापैकी २४ आश्रमशाळा शासकीय इमारतीत कार्यरत असून २ आश्रमशाळा भाड्याच्या इमारतीत कार्यरत आहेत. त्यापैकी एका आश्रमशाळेसाठी जमीन प्राप्त झालेली आहे.

आश्रमशाळेतील आदिवासी विद्यार्थ्यांना सोयी सुविधा उपलब्ध करुन देण्याकरीता वॉश कार्यक्रमांतर्गत शासकीय आश्रमशाळांतील स्वच्छतागृहे, स्नानगृहांची दुरुस्ती करणे, आवश्यकतेनुसार स्वच्छतागृहे व स्नानगृहांची बांधकाम हॅन्डवॉश स्टेशनचे नवीन बांधकाम करणे, पाणीपुरवठा व भोजनगृहांची स्वच्छता करणे, तसेच वॉश कार्यक्रम राबविण्याकरीता आश्रमशाळा कायापालट अभियान कालबध्द पध्दतीने राबविण्यात येऊन विद्यार्थ्यांना भौतिक, निवासाच्या, आरोग्याच्या व शालेय विषयक सोयी सुविधा पुरविण्यात येत आहेत.

आदिवासी विकास विभागांतर्गत आश्रमशाळेत एकूण १२ ते १६ सदस्यांची शालेय व्यवस्थापन समिती गठीत करण्यात आलेली असून त्या अंतर्गत समितीकडून शाळेवरील नियंत्रण व आवश्यक सुविधा पुरविण्याबाबत व्यवस्थापन केले जाते. शाळा व्यवस्थापन समितीस रुपये ५ लक्ष निधी खर्च करण्याचे अधिकार दिले आहेत.
(३) यवतमाळ जिल्हयात प्रकल्प कार्यालय पांढरकवडा अंतर्गत १९ शासकीय वसतिगृह तसेच प्रकल्प कार्यालय पुसद अंतर्गत ११ वसतिगृह अशी एकूण ३० वसतिगृह कार्यरत आहेत. सदर ३० वसतिगृहांपैकी ५ वसतिगृहे शासकीय

इमारतीत असून २५ वसतिगृहे भाड्याच्या इमारतीत कार्यरत आहेत. त्यापैकी २२ वसतिगृहांसाठी जमीन प्राप्त झालेली असून त्यापैकी ६ ठिकाणी बांधकाम प्रगतीत असून ४ वसतिगृहांची अंदाजपत्रके प्रशासकीय मान्यतेसाठी शासनास सादर झालेली आहेत. उर्वरित वसतिगृहांची अंदाजपत्रके तयार करणे सुरु आहे.

पुसद प्रकल्प कार्यालयांतर्गत एकूण ११७४ पदे मंजूर असून त्यापैकी ४६२ पदे रिक्त आहेत. सदर पदे भरण्याबाबतची कार्यवाही सुरु आहे. आश्रमशाळांमध्ये सोयी सुविधा पुरविण्यात येत आहेत.

प्रकल्प कार्यालय पांढरकवडा व पुसद अंतर्गत सन २०१८-१९ या वर्षात शैक्षणिक संस्थेमध्ये प्रवेशित विद्यार्थ्यांना सुवर्ण महोत्सवी शिष्यवृत्ती योजना, भारत सरकार शिष्यवृत्ती योजना, वैद्यकीय शिष्यवृत्ती तसेच शिक्षण शुल्क व परीक्षा शुल्क अशा विविध योजनांतर्गत एकूण ७२,७५९ विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती अदा करण्यात आलेली आहे.

कुपोषण व बालमृत्यू नियंत्रण करण्याकरीता नवसंजीवन योजनेंतर्गत महिला व बालविकास विभागांतर्गत राबविण्यात येणाऱ्या ३३२ ग्राम बालविकास केंद्र (VCDC) मध्ये भरती केलेल्या बालकांवर विशेष लक्ष देण्यात येत आहे. तसेच डॉ.ए.पी.जे.अब्दुल कलाम अमृत आहार योजना राबविण्यात येत असून त्या अंतर्गत टप्पा १ या योजनेंतर्गत गरोदर स्त्रिया व स्तनदा माता यांना गरोदरपणाची नोंदणी झाल्यापासून ते बाळ ६ महिन्याचे होईपर्यंत दररोज एक वेळ चौरस आहार देण्यात येत असून टप्पा २ अंतर्गत ७ महिने ते ६ वर्षे वयोगटातील बालकांना आठवड्यातील ४ दिवस अंडी, केळी देण्यात येत असून या योजनेमुळे कुपोषित बालकांमध्ये निश्चितपणे सुधारणा होत आहे. तसेच संसर्गजन्य आजारामुळे मृत्यू झाल्याची बाब निदर्शनास आलेली नाही. नवसंजीवन क्षेत्रातील ज्या ठिकाणी आरोग्य सुविधा पोहचण्यामध्ये अडचणी येतात अशा अतिदुर्गम भागामध्ये रुग्णांना तातडीने सेवा मिळण्याकरीता ५ भरारी पथकांच्या नियुक्त्या करण्यात आलेल्या आहेत.

(४) उपरोक्त प्रमाणे योजना राबविण्यात येत असून चौकशी करण्याचा प्रश्न उद्भवत नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## सुर्यमाळ आश्रमशाळेच्या (ता.मोखाडा, जि.पालघर) इमारतीचे बांधकाम निकृष्ट दर्जाचे झाल्याबाबत

**(२८) * ४७३४५ श्री.रविंद्र फाटक : तारांकित प्रश्न क्रमांक ४५४०८ ला दिनांक २२ नोव्हेंबर, २०१८ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सुर्यमाळ आश्रमशाळेच्या (ता.मोखाडा, जि.पालघर) इमारतीचे बांधकाम निकृष्ट दर्जाचे झाल्याबाबत संबंधित अधिकारी/कर्मचारी यांच्याविरुध्द सुरु असलेली विभागीय चौकशी सार्वजनिक बांधकाम विभागाकडून पूर्ण झाली आहे काय,

(२) असल्यास, सदर विभागीय चौकशीत दोषी आढळून आलेल्यांविरुध्द कोणती कारवाई केली तसेच दोषी ठेकेदाराला काळया यादीत टाकण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. अशोक उईके :** (१) सार्वजनिक बांधकाम विभागांतर्गत असलेल्या अधीक्षक अभियंता, दक्षता व गुणनियंत्रण मंडळ, नवी मुंबई यांचे कडून चौकशी चालू आहे.

(२) संबंधित अधिकारी/कर्मचारी यांची चौकशी सुरु असून चौकशी अहवाल प्राप्त होताच सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत सबंधित दोषी अधिकारी व ठेकेदार यांच्यावर कारवाई करण्यात येत आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## भगवती भुवन को-ऑप. हौसिंग सोसायटी लिमिटेड, मुंबई संस्थेवर प्राधिकृत अधिकाऱ्यांची नेमणूक करण्याबाबत

**(२९) * ४७९९३ श्री.सुभाष झांबड :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भगवती भुवन को-ऑप. हौसिंग सोसायटी लिमिटेड, ३१ बी, पेडर रोड, मुंबई या संस्थेच्या संचालक मंडळाने संस्थेचे काम करतेवेळी महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियमाखालील नियम व उपविधी मधील तरतूदींचे उल्लघंन केल्याबाबत तसेच, सन २०१५ ते सन २०१८ च्या कालावधीत संस्थेमध्ये आर्थिक गैरव्यवहार केल्याबाबत तपासणी अधिकारी तथा सहकारी अधिकारी व सहाय्यक सहकारी अधिकारी अधिन उपनिबंधक, सहकारी संस्था डी विभाग, मुंबई यांनी उपनिबंधक, सहकारी संस्था, डी विभाग, मुंबई यांना माहे मार्च, २०१९ मध्ये वा त्यादरम्यान तपासणी अहवाल सादर केला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, संस्थेचा तपासणी अहवालात संस्थेने सन २०१६-१७ व २०१७-१८ या कालावधीचा लेखापरिक्षण दोष दुरुस्ती अहवाल सादर केलेला नसून संस्थेकडे नमुना ओ रजिस्टर नसल्यामुळे संस्थेने कायदा कलम ८२ चे उल्लंघन केले असून सदर संस्थेच्या तपासणी अहवाल करतेवेळी संस्थेने सदनिका हस्तांतरण प्रिमियम व्यतिरिक्त डोनेशन स्वीकारल्याची माहिती उपलब्ध करुन दिली नसून राज्य घटना (९७ वी घटना दुरुस्ती) अधिनियम २०११ च्या अनुषंगाने सहकारी संस्था अधिनियम, १९६० मध्ये शासनाने सहकार कायद्यात केलेल्या सुधारणाच्या अनुषंगाने नवीन उपविधी स्वीकारलेली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर संस्थेची नियमित सभा होत नसून संस्थेच्या सन २०१७ पासूनच्या वार्षिक सर्वसाधारण सभेस वारंवार गैरहजर असणाऱ्या सभासदांवर संस्था कारवाई करत नसल्याने संस्थेचे चेअरमन, सेक्रेटरी व व्यवस्थापक समिती सदस्य यांनी महाराष्ट्र संस्था अधिनियम १९६० चे कलम २६ (२) चे उल्लंघन केले असल्याने संस्थेच्या पदाधिकाऱ्यांवर कारवाई करण्याची मागणी सदर संस्थेच्या सदस्यांनी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, संस्थेविरुध्द सुरु असलेल्या कायदेशीर दाव्याबाबत होणाऱ्या खर्चासाठी लिगल फी सदनिकाच्या क्षेत्रफळानुसार आकारण्याचा ठराव पारीत झालेला असतानाही सर्व सभासदांकडून सम प्रमाणात फी आकारण्यात आली असून ज्या सभासदाविरुध्द कायदेशीर कारवाई करण्यात आलेली आहे त्याच्याकडून दुबार लिगल फी आकारण्यात आली आहे, तसेच संस्थेच्या पदाधिकाऱ्यांनी स्वत:च्या आर्थिक हितासाठी तीन वर्षापूर्वी मृत झालेल्या

श्रीमती मंजूदेवी शंकरलाल अग्रवाल यांच्या नावे सन २०१७ मध्ये सोसायटीमधील दुसऱ्या मजल्यावरील फ्लॅट क्रमांक २ हस्तांतरीत केला असून याबाबतची माहिती सोसायटीच्या सभासदांना न देता लपवून ठेवल्याची बाब निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, सदर संस्थेचे पदाधिकारी सोसायटीमधील वास्तव्यास असणाऱ्या इतर सदस्यांना जाणुनबुजून नाहक त्रास देत असून याबाबत सदर संस्थेविरुध्द दिनांक २५ मार्च, २०१९ रोजी गांवदेवी पोलीस ठाणे, मुंबई येथे तक्रार करण्यात येवूनही संस्थेचे पदाधिकाऱ्यांवर कोणतीही कारवाई करण्यात आली नसल्यामुळे उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन सदर संस्थेच्या पदाधिकाऱ्यांवर फौजदारी गुन्हे दाखल करुन सदर संस्थेवर प्राधिकृत अधिकाऱ्याची नियुक्ती करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.सुभाष देशमुख :** (१) अंशत: खरे आहे.

(२) अंशत: खरे आहे.

तथापि, संस्थेने सदनिका हस्तांतरण प्रिमियम व्यतिरिक्त डोनेशन स्विकारल्याबाबत आर्थिक पत्रकामध्ये नोंदी आढळून येत नाही.

(३) हे खरे नाही.

(४) अंशत: खरे आहे.

श्रीमती मंजू देवी अगरवाल यांचे नावे हस्तांतरण झालेली सदनिका ही दुसऱ्या मजल्यावरील सदनिका क्र.२ नसून ती सदनिका क्र. ६ आहे. सदरचे हस्तांतरण दिनांक १२/०३/२०१७ रोजीच्या व्यवस्थापक समितीच्या सभेमध्ये मंजूर करण्यात आले असून त्याबाबतची माहिती संस्थेच्या सभासदांपासून लपवून ठेवल्याची बाब निदर्शनास आलेली नाही.

(५) सदर संस्थेच्या पदाधिकाऱ्यांच्या विरोधात महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ७५(५) अन्वये कारवाई करण्यात आलेली आहे.

तसेच सदर अधिनियमाच्या कलम ७७(अ) अन्वये संस्थेची व्यवस्थापक समिती निष्प्रभावीत करुन संस्थेवर प्राधिकृत अधिकाऱ्यांची नियुक्ती करण्यात आलेली आहे.

-----------------

## राज्यात एमएससी नर्सिंग अभ्यासक्रमात प्रवेश घेतलेल्या मागासवर्गीय विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती मिळणेबाबत

**(३०) * ४७०२९ श्री.आनंदराव पाटील, श्री.शरद रणपिसे, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.रामहरी रुपनवर, श्री.अमरनाथ राजूरकर, डॉ.सुधीर तांबे, ॲड.हुस्नबानू खलिफे, डॉ.वजाहत मिर्झा, श्री.हरिसिंग राठोड :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शासनाच्या समाजकल्याण विभागाच्या निष्काळजीपणामुळे एमएससी नर्सिंग या पदव्युत्तर अभ्यासक्रमात प्रवेश घेतलेल्या मागासवर्गीय विद्यार्थ्यांना शिष्यवृत्तीपासून वंचित रहावे लागत असल्याचे दिनांक ९ मार्च, २०१९ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शिष्यवृत्तीकरीता नोंदणी करावयाच्या महाडीबीटी संकेतस्थळावर नर्सिंगच्या पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमाची नोंदच नसल्यामुळे विद्यार्थ्यांचा शिष्यवृत्तीचा अर्ज स्वीकारला जात नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन संकेतस्थळावर नर्सिंग पदव्युत्तर अभ्यासक्रमाचा समावेश करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. सुरेश (भाऊ) खाडे :** (१) हे खरे नाही.

(२) हे खरे नाही.

(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## परभणी जिल्हयातील शेतकऱ्यांना वीज जोडणी मिळणेबाबत

**(३१) * ४७२८१ श्री.विप्लव बाजोरिया, श्री.गोपिकिशन बाजोरीया :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) परभणी जिल्हयातील अनेक शेतकरी तीन वर्षापासून वीज जोडणीच्या प्रतिक्षेत असल्याचे माहे एप्रिल, २०१९ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, जिल्ह्यातील तीन हजार शेतकऱ्यांनी कृषीपंपासाठी कोटेशनची रक्कम भरुनही वीज जोडणीचे साहित्य महावितरण कंपनीकडून देण्यात आलेले नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, महावितरण कंपनीकडे कोटेशनची रक्कम भरुनही वीज जोडणी न देण्यामागची कारणे काय आहेत,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन संबंधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.चंद्रशेखर बावनकुळे :** (१) परभणी जिल्ह्यामध्ये माहे एप्रिल, २०१९ अखेर ४५७७ कृषीपंप अर्जदार महावितरण कंपनीकडे पैसे भरुन वीज जोडणीकरीता प्रलंबित आहेत.

(२) हे खरे नाही. परभणी जिल्ह्यामध्ये मागील ३ वर्षात एकूण ४१२३ इतक्या कृषीपंपाचे ऊर्जीकरण करण्यात आले आहे.

(३) राज्य शासनाच्या उच्चदाब वितरण प्रणाली योजनेंतर्गत परभणी जिल्ह्यातील पैसे भरुन प्रलंबित असलेल्या ४२९२ कृषीपंप अर्जदारांचा समावेश असून त्यापैकी एप्रिल, २०१९ अखेर एकूण ३०६ कृषीपंपाचे ऊर्जीकरण करण्यात आले आहे व उर्वरित कृषीपंप ऊर्जीकरणाची कामे प्रगतीपथावर आहेत.

दिनांक ३१ मार्च, २०१८ नंतर कोटेशनचा भरणा केलेल्या ३८३ अर्जदारांना मुख्यमंत्री सौर कृषीपंप योजनेंतर्गत सोलार पंप देण्यासाठी संबंधित कंत्राटदारांना कार्यादेश देण्यात आलेले आहेत.

(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यातील जिल्हा जात प्रमाणपत्र पडताळणी समित्यांना अध्यक्ष नसल्याबाबत

**(३२) * ४७२२४ श्री.गोपिकिशन बाजोरीया :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महसूल विभागांतर्गत येणाऱ्या ३६ पैकी २२ जिल्हा जात प्रमाणपत्र पडताळणी समित्यांना पूर्णवेळ अध्यक्ष नसल्याचे माहे एप्रिल, २०१९ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, अनुसूचित जमाती वगळता अन्य सर्व जातींच्या ०१ लाख ७८ हजार ७२० पेक्षाही अधिक जात प्रमाणपत्रांची पडताळणी प्रलंबित आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, जात प्रमाणपत्रांची पडताळणी प्रलंबित असल्यामुळे याचा फटका आरक्षित विद्यार्थी, नोकरभरतीसाठी पात्र उमेदवारांना बसत आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार महसूल विभागांतर्गत येणाऱ्या ३६ पैकी २२ जिल्हा जात प्रमाणपत्र पडताळणी समित्यांना पूर्णवेळ अध्यक्ष नेमण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. सुरेश (भाऊ) खाडे :** (१) अंशत: खरे आहे.

सद्य:स्थितीत राज्यातील ३६ जिल्हा जात प्रमाणपत्र पडताळणी समित्यांपैकी १४ समित्यांच्या अध्यक्ष पदावर नियमित अधिकारी कार्यरत आहेत. रिक्त असलेल्या पदांचा अतिरिक्त कार्यभार अन्य अधिकाऱ्यांकडे सोपविण्यात आला असून समित्यांचे नियमित कामकाज सुरळीत सुरू आहे.

(२) व (३) नाही.

सद्य:स्थितीत माहे मे, २०१९ अखेर सर्व ३६ समित्यांकडे एकूण ३५०१९ प्रकरणे कार्यवाहीकरीता प्रलंबित असून त्यापैकी २५३२६ प्रकरणे तीन महिन्याच्या आतील आहेत. तर तीन महिन्यापेक्षा जास्त कालावधीची केवळ ९६९३ प्रकरणे प्रलंबित आहेत.

तसेच दिनांक १२ जून, २०१९ पासून विद्यार्थ्यांची प्राप्त होणारी प्रकरणे तातडीने निकाली काढण्यासाठी विशेष मोहिम हाती घेण्यात आली आहे.

(४) अध्यक्षांच्या ३६ पदांपैकी ३० पदे महसूल व वन विभागामार्फत भरण्यात येतात. सदर पदांपैकी रिक्त पदे भरण्याच्या अनुषंगाने त्यांचेद्वारे कार्यवाही करण्यात येत आहे.

तर समाजकल्याण विभागातील प्रस्तुत पदावर पदोन्नतीकरीता पात्र एका अधिकाऱ्यांस पदोन्नती देण्याच्या अनुषंगाने कार्यवाही सुरु आहे. उर्वरित पदांवर नियुक्तीकरीता इच्छुक समकक्ष पदांवरील अधिकाऱ्यांकडून सामान्य प्रशासन विभागामार्फत इच्छुकता मागविण्यात आली आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## बीड येथे मातंग समाजातील तरुणाने जलसमाधी घेतल्याबाबत

**(३३) * ४७१९१ श्री.अमरिशभाई पटेल, श्री.शरद रणपिसे, श्री.रामहरी रुपनवर, ॲड.हुस्नबानू खलिफे, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.आनंदराव पाटील, डॉ.सुधीर तांबे, श्री.हरिसिंग राठोड :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बीड येथे मातंग तरुणाच्या जलसमाधी प्रकरणानंतर मातंग समाजाने राज्यभर शासनाविरोधात निदर्शने सुरु केली असल्याचे माहे मार्च, २०१९ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, स्वतंत्र आरक्षणासाठी बलिदान दिलेल्या मृत श्री.संजय ताकतोडे यांच्या कुटूंबाला आर्थिक मदतीची व एका सदस्यास नोकरीत सामावून घेण्याची मागणी मातंग समाजाने शासनाकडे केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. सुरेश (भाऊ) खाडे :** (१) होय.

(२) होय.

(३) सदर प्रकरणी मयत तरुणाच्या कुटूंबास तातडीची मदत म्हणून रुपये ३.०० लाख अर्थसहाय्य देण्यात आले आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

----------------

## शेतकऱ्यांना विद्‌युत मंडळाकडून विद्‌युत जोडणी व सोलारपंप देण्यात येत असल्याबाबत

**(३४) * ४७८१९ श्री.विनायकराव मेटे :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात गत सहा महिन्यापासून शेतकऱ्यांना सोलार पंप व आवश्यकतेप्रमाणे विद्‌युत जोडणी बंधनकारक असतानाही विद्‌युत मंडळ शेतकऱ्यांना लाभ देत नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, शेतकऱ्यांनी आंदोलनाचा पवित्रा घेतल्यावर त्यांना गत सहा महिन्यापासून सोलार पंपाकरीता ऑनलाईन अर्ज करा असे सांगण्यात आले असून एकाही शेतकऱ्याला सोलार पंपाची जोडणी देण्यात आलेली नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सोलार पंपाकरीता ऑनलाईन अर्ज केल्यानंतर काही दिवसांनी "तुमच्या अर्जामध्ये त्रुटी आहे" असा फोनवर संदेश येतो यामुळे अर्ज नाकारण्यात येत आहेत, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, ज्या शेतकऱ्यांना सोलार पंप मंजूर झाले आहेत, त्यांना "तुमच्याकडे पाण्याचे स्तोत्र उपलब्ध नसल्यामुळे मंजूर झालेला सोलार पंप नाकारण्यात आला आहे" असे सांगण्यात येते, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन विद्‌युत मंडळाने विद्‌युत जोडणी तसेच सोलार पंप देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.चंद्रशेखर बावनकुळे :** (१) हे खरे नाही. महावितरणद्वारे शेतकऱ्यांना दिवसा सिंचन करणे शक्य व्हावे, या प्रमुख उद्दीष्टाकरीता राज्यात पारेषणविरहीत सौर कृषीपंप उपलब्ध करण्यासाठी “मुख्यमंत्री सौर कृषी पंप योजना” राबविण्यात येत आहे. तसेच दिनांक ३१/०३/२०१८ पूर्वीच्या वीज जोडणीकरीता पैसे भरुन प्रलंबित असणाऱ्या अर्जदारांकरीता उच्चदाब वितरण प्रणाली योजना राबविण्यात येत आहे.

(२) हे खरे नाही.

(३) मुख्यमंत्री सौर कृषी पंप योजनेंतर्गत दिनांक ०२/०६/२०१९ अखेर १,५५,४९७ अर्ज प्राप्त झाले असून त्यापैकी ५४,८४२ अर्ज नामंजूर करण्यात आले आहेत. सदर अर्ज ठरविलेल्या पात्रता निवड व निकषामध्ये न बसल्यामुळे तसेच आवश्यक कागदपत्रे अर्जासोबत अपलोड न केल्यामुळे अपात्र करण्यात आले आहेत. सदर योजनेच्या प्रत्येक टप्प्यात अर्जदाराला अर्जाची सद्य:स्थिती एस.एम.एस.द्वारे अवगत करण्यात येते.

(४) हे खरे आहे. सौर कृषी पंप आस्थापित करण्यापूर्वी अर्जदार, पुरवठादाराचा प्रतिनिधी व महावितरणचा प्रतिनिधी यांच्याद्वारे संयुक्तिक पहाणी करण्यात येते. संयुक्तिक पहाणी दरम्यान सदर ठिकाणी शाश्वत जलस्त्रोत उपलब्ध नसल्याचे आढळल्यास सदर शेतकऱ्यांचा अर्ज अपात्र ठरविण्यात येतो.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## कृष्णूर (जि.नांदेड) औद्योगिक वसाहतीला पाणीपुरवठा करणाऱ्या पाईपलाईनला गळती लागल्याबाबत

**(३५) * ४७२४९ श्री.अमरनाथ राजूरकर, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.शरद रणपिसे, श्री.रामहरी रुपनवर, श्री.आनंदराव पाटील, ॲड.हुस्नबानू खलिफे, श्री.हरिसिंग राठोड :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नांदेड जिल्ह्यातील कृष्णूर पंचतारांकित औद्योगिक वसाहतीला पाणीपुरवठा करणाऱ्या विष्णुपूरी प्रकल्पाच्या पाईपलाईनला अनेक ठिकाणी

गळती होऊन दररोज हजारो लिटर पाणी वाया जात असल्याचे दिनांक १२ जानेवारी, २०१९ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर पाईपलाईनच्या देखभालीसाठी नेमलेला गुत्तेदार अधिकाऱ्यांच्या संगनमताने पाईपलाईनच्या दुरुस्तीचे काम न करताच देयके मंजूर करीत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन पाईपलाईनची दुरुस्ती करण्याबाबत तसेच दोषी गुत्तेदार व संबंधित अधिकारी यांच्यावर कारवाई करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.सुभाष देसाई :** (१), (२) व (३) कृष्णूर औद्योगिक क्षेत्रास पाणीपुरवठा करणाऱ्या पाईपलाईनला १२ जानेवारी, २०१९ रोजी वा त्यादरम्यान गळती होऊन हजारो लीटर पाणी वाया गेले असल्याची बाब निदर्शनास आली नाही व त्यानुषंगाने महामंडळाकडे कोणतीही तक्रार प्राप्त झाली नाही.

कृष्णूर औद्योगिक क्षेत्रास पाणीपुरवठा करणाऱ्या जलवाहिनीची देखभाल व दुरूस्तीच्या कामासाठी कंत्राटदाराची नेमणूक करण्यात आलेली आहे व दुरुस्तीची कामे त्यांच्याकडून तातडीने करुन घेतली जातात.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यात मुलींसाठी मंजूर केलेली वसतिगृह कार्यान्वित करण्याबाबत

**(३६) * ४७०४६ श्री.विलास पोतनीस : तारांकित प्रश्न क्रमांक ४३९८२ ला दिनांक २२ नोव्हेंबर, २०१८ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सामाजिक न्याय विभागाने मुलींसाठी ५० वसतिगृह नव्याने सुरु करण्याचा निर्णय अडीच वर्षांपूर्वी घेतला असून या विभागातील पदांचा आकृतिबंध निश्चित करण्याचा प्रस्ताव वित्त विभागाला दिनांक १७ ऑक्टोबर, २०१७ रोजी वा त्यासुमारास सादर करण्यात आला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सामाजिक न्याय विभागाच्या प्रस्तावास वित्त विभागाने मान्यता दिली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, राज्यात मुलींसाठी मंजूर केलेली ५० वसतिगृह कार्यान्वित करण्याबाबतची सद्य:स्थिती काय आहे,
(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, तद्नुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. सुरेश (भाऊ) खाडे :** (१) होय.
(२) नव्याने स्थापन केलेल्या मुलींच्या ५० वसतिगृहांकरीता आवश्यक पदांची निर्मिती करण्यास अप्पर मुख्य सचिव (सेवा) यांच्या अध्यक्षतेखालील उपसमितीने मान्यता दिलेली असून, उपसमितीने दिलेल्या अभिप्रायानुसार प्रस्ताव मा.मुख्य सचिव यांच्या अध्यक्षतेखालील उच्च अधिकारी समितीसमोर सादर करण्यात आला आहे. सदर पदे निर्माण करण्यास समितीने मान्यता दिल्यानंतर सक्षम प्राधिकारी यांच्या मान्यतेने पदनिर्मितीचे आदेश निर्गमित करण्यात येतील.
(३) सद्य:स्थितीत सदरील ५० वसतिगृहापैकी ४२ वसतिगृहे भाडेतत्वावरील इमारतीमध्ये सुरु करण्यात आली असून उर्वरित वसतिगृहे सुरु करण्याची कार्यवाही जिल्हास्तरावर सुरू आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## हिंगोली जिल्हयातील शेतकऱ्यांना कर्जमाफी मिळण्याबाबत

**(३७) * ४७१०८ श्री.रामराव वडकुते, श्री.विक्रम काळे, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) हिंगोली जिल्ह्यातील शेतकऱ्यांनी कर्जमाफी मिळण्याबाबत अर्ज करुनही मागील २ वर्षापासून त्यांना कर्जमाफीचा लाभ मिळाला नाही, जिल्ह्यात कर्जमाफीसाठी १ लाख ९ हजार शेतकऱ्यांनी ऑनलाईन पध्दतीने कर्जमाफीचे अर्ज भरले असून कर्जमाफी झालेल्या २३ शेतकऱ्यांचा सत्कार करण्यात आला व काही शेतकऱ्यांना पालक मंत्र्यांच्या हस्ते कर्जमाफीचे प्रमाणपत्रही देण्यात आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कर्जमाफी झालेल्या शेतकऱ्यांनी बँकेत चौकशी केली असता त्यांच्या नावे कर्जमाफीची रक्कम बँकेत जमा झाली नसल्याचे आढळून आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, कर्जमाफीची रक्कम पात्र शेतकऱ्यांच्या बँक खात्यावर जमा न करण्याची कारणे काय आहेत व कधीपर्यंत रक्कम जमा होणे अपेक्षित आहे,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व या शेतकऱ्यांना कर्जमाफीचा लाभ देण्याबाबत कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.सुभाष देशमुख :** (१) होय.

दिनांक १८/१०/२०१७ रोजी हिंगोली जिल्ह्यातील २१ शेतकऱ्यांचा सत्कार मा.पालकमंत्र्यांच्या हस्ते कर्जमाफीचे प्रमाणपत्र देऊन करण्यात आला.

(२) व (३) कर्जमाफी योजनेमध्ये राज्यातील ५०.२७ लाख खातेदारांना पात्र ठरविण्यात आले. यापैकी कर्जमाफी व प्रोत्साहनपर रक्कम या बाबींसाठी पात्र ठरविण्यात आलेल्या एकूण खातेदारांपैकी सुमारे ९९% खातेदारांना योजनेंतर्गत लाभ देण्यात आलेला असून उर्वरीत १% पात्र खातेदारांना लाभ देण्याची कार्यवाही सुरु आहे. तसेच, पात्र खातेदारांपैकी एकरकमी परतफेड योजनेंतर्गत पात्र असलेल्या खातेदारांना त्यांच्या हिश्श्याची रक्कम भरल्यानंतर त्यांना कर्जमाफी योजनेंतर्गत लाभ देण्याची कार्यवाही करण्यात येत आहे.

(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यात गोवारी समाजाला अनुसूचित जमातीचे लाभ देण्याबाबत

**(३८) * ४६७६४ श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.शरद रणपिसे, श्री.रामहरी रुपनवर, श्री.अमरनाथ राजूरकर, डॉ.सुधीर तांबे, ॲड.हुस्नबानू खलिफे, डॉ.वजाहत मिर्झा, श्री.हरिसिंग राठोड, श्री.मोहनराव कदम, श्री.आनंदराव पाटील : तारांकित प्रश्न क्रमांक ४४०५९ ला दिनांक २२ नोव्हेंबर, २०१८ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात गोंड-गोवारी अशी स्वतंत्र जमात अस्तित्वात नसून ज्यांना गोंड गोवारी संबोधले जात आहे ते सर्वजण गोवारी आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, गोवारी समाजाला अनुसूचित जमातीचे लाभ लागू करण्याच्या निर्णयावर समिती नेमण्यास सर्वोच्च न्यायालयाने नकार दिला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, गोवारी समाजाला अनुसूचित जमातीचे लाभ देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. अशोक उईके :** (१), (२), (३) व (४) भारतीय संविधानाच्या अनुच्छेद ३४२ (१) अन्वये मा.राष्ट्रपती महोदयांनी दिनांक ०६/०९/१९५० रोजी अनुसूचित जमातीची प्रथम यादी घोषित केली असून भारतीय संविधानाच्या अनुच्छेद ३४२ (२) अन्वये संसदेने त्यामध्ये वेळोवेळी सुधारणा केलेल्या आहेत. सदर सुधारणांच्या अनुषंगाने महाराष्ट्र राज्याच्या अनुसूचित जमातीच्या यादीत अनुक्रमांक १८ येथे Gond,...,Gond Gowari,... अशी नोंद आहे. महाराष्ट्र राज्याच्या अनुसूचित जमातीच्या यादीमध्ये नोंद असलेल्या अनुसूचित जमातींना अनुसूचित जमातीचे लाभ अनुज्ञेय आहेत.

मा.उच्च न्यायालय खंडपीठ नागपूर यांनी रिट याचिका क्र. ४०३२/२००९ मध्ये दिनांक १४/०८/२०१८ रोजी दिलेल्या निर्णयाविरुध्द मा.सर्वोच्च न्यायालयात विशेष अनुज्ञा याचिका दाखल करण्यासाठी विधी व न्याय विभागाची दिनांक १७/११/२०१८ रोजी मान्यता प्राप्त झाली असून सरकारी वकील नवी दिल्ली यांना विशेष अनुज्ञा याचिका दाखल करण्याबाबत

कळविण्यात आले आहे. दरम्यान अन्य व्यक्तींमार्फत सदर न्याय निर्णयाविरुध्द मा.सर्वोच्च न्यायालयात विशेष अनुज्ञा याचिका दाखल केली असून मा.सर्वोच्च न्यायालयाने ती दाखल करुन घेतलेली आहे.

महाराष्ट्र राज्यातील अनुसूचित जमातीच्या यादीतील गोंडगोवारी या नोंदीऐवजी गोवारी अशी दुरुस्ती करुन गोवारी समाजाचा अनुसूचित जमातीमध्ये समावेश करण्याच्या मागणीच्या अनुषंगाने गोवारी समाजाचे अभ्यासपूर्वक संशोधन करण्याचे काम टाटा सामाजिक विज्ञान संस्था, मुंबई या संस्थेकडे देण्यात आले आहे.

-----------------

## रत्नागिरी जिल्ह्यात कृषी विकास योजनेंतर्गत शेती पंप जोडणी देण्याबाबत

**(३९) * ४७८२४ अॅड.हुस्नबानू खलिफे, श्री.आनंदराव पाटील, श्री.रामहरी रुपनवर, श्री.शरद रणपिसे** : सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रत्नागिरी जिल्ह्यात कृषी विकास योजनेंतर्गत महावितरण कंपनीचा सुमारे ७ हजार १०० जोडण्यांचा अनुशेष असतानाही, तसेच यासाठी स्वतंत्र निधी उपलब्ध असतानाही शेती पंप जोडणीत पिछाडीवर असल्याची बाब माहे एप्रिल, २०१९ च्या दुसऱ्या सप्ताहात निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, रत्नागिरी जिल्ह्यातील शेतकऱ्यांना शेती पंप जोडणी देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.चंद्रशेखर बावनकुळे :** (१) व (२) रत्नागिरी जिल्ह्यात विविध योजनांतर्गत माहे मार्च, २०१९ पर्यंत २०,०७६ कृषीपंपाना वीज जोडणी दिलेली आहे. माहे मार्च, २०१९ अखेर पैसे भरुन प्रलंबित असणाऱ्या ६४० कृषीपंपाना उच्चदाब वितरण प्रणाली व सौर कृषीपंप योजनेंतर्गत सामावून पुढील कार्यवाही करण्यात येत आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## वीज नियामक आयोगाने ध्वनिचित्रफीती नष्ट करण्याचा निर्णय घेतल्याबाबत

**(४०) * ४६७२८ श्री.अनिकेत तटकरे, श्री.धनंजय मुंडे, श्रीमती विद्या चव्हाण, श्री.विक्रम काळे, श्री.सतिश चव्हाण, श्री.जगन्नाथ शिंदे, श्री.किरण पावसकर, श्री.हेमंत टकले :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वीज नियामक आयोगातील सुनावण्यांच्या ध्वनिचित्रफीती न काढण्याचा व यापूर्वीच्या सर्व ध्वनिचित्रफीती नष्ट करण्याचा नियमबाह्य निर्णय आयोगाने दिनांक ४ सप्टेंबर, २०१८ रोजी वा त्यासुमारास घेतला, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उच्च न्यायालयात सदर निर्णयाविरुध्दचे प्रकरण निर्णयाधीन असताना न्यायालयाच्या निर्णयापूर्वी तसेच वीज कायदा कलम ८६ (३) व सार्वजनिक अभिलेख कायदा कलम ८ व ९ नुसार बेकायदेशीरपणे ध्वनिचित्रफीती नष्ट करण्यात आल्याची बाब निदर्शनास आली, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, बेकायदेशीर कृत्य करणाऱ्या, पारदर्शकता नष्ट करणाऱ्या आयोगाच्या अध्यक्षांसह सर्व सदस्यांना पदमुक्त करण्याची मागणी सामान्य जनतेकडून होत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व याबाबत निर्णय घेऊन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.चंद्रशेखर बावनकुळे :** (१) यासंदर्भात महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगाने दिनांक ०४/०९/२०१८ रोजी खालीलप्रमाणे निर्णय घेतला आहे :-

१. यापुढे आयोगासमोर होणाऱ्या कार्यवाहीचे दृकश्राव्य (Video) किंवा श्राव्य (Audio) स्वरुपातील रेकॉर्डिंग केले जाणार नाही,
२. आयोगासमोरील कार्यवाहीचे दृकश्राव्य स्वरुपातील रेकॉर्डिंग केलेली कॉम्पॅक्ट डिस्क (सीडी) सर्वसाधारण जनतेचा भाग असलेल्या सदस्याला पुरविली अथवा उपलब्ध करुन दिली जाणार नाही,

३. आजवर केलेले सर्व रेकॉर्डिंग जे कार्यालयीन अभिलेखाचा भाग नसल्यामुळे योग्य वेळी नष्ट करण्यात येईल,

(२) हे खरे नाही.

(३) अशा आशयाची निवेदने प्राप्त झाली आहेत.

(४) व (५) सदरचे प्रकरण न्यायप्रविष्ट आहे.

----------------

## मुंबई उपनगरातील नियमित व कंत्राटी वीज कामगारांच्या मागण्यांबाबत

**(४१) * ४७०७२ श्री.जनार्दन चांदूरकर, श्री.शरद रणपिसे, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.रामहरी रुपनवर, श्री.आनंदराव पाटील, अॅड.हुस्नबानू खलिफे, आर्कि.अनंत गाडगीळ, श्री.अमरनाथ राजूरकर, श्री.हरिसिंग राठोड, श्री.मोहनराव कदम, डॉ.सुधीर तांबे : तारांकित प्रश्न क्रमांक ४४६६५ ला दिनांक २२ नोव्हेंबर, २०१८ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई उपनगरातील नियमित व कंत्राटी वीज कामगारांच्या मागणीपत्रावर माहे सप्टेंबर, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान केलेल्या वेतन कराराची अंमलबजावणी तसेच कंत्राटी कामगारांना कायम पदावर सामावून घेणे, कामगारांच्या पाल्यांना नोकरीमध्ये घेणे, मृत कामगारांच्या वारसांना नोकरी देणे, पदोन्नती धोरण ठेवणे आदी मागण्यांसाठी काम बंद आंदोलन करण्याचा इशारा दिनांक १९ फेब्रुवारी, २०१९ रोजी वा त्यासुमारास शासनास दिला, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, वीज कामगारांच्या मागण्यांकडे रिलायन्स व अदानी व्यवस्थापनाकडून दुर्लक्ष केले जात आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन वीज कामगारांच्या मागण्यांबाबत कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.चंद्रशेखर बावनकुळे :** (१) हे खरे नाही.

महानिर्मिती, महापारेषण आणि महावितरण या कंपन्यांमध्ये माहे सप्टेंबर, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान नियमित व कंत्राटी कामगारांच्या मागणीपत्रावर कोणताही वेतन करार झालेला नाही.

(२) हे खरे नाही.

वीज कामगारांच्या पूर्वीच्या वेतन कराराच्या अंमलबजावणी अनुषंगाने उद्‌भवलेल्या समस्यांबाबत अदानी इलेक्ट्रिसिटी मुंबई लि. च्या व्यवस्थापनाची मुंबई इलेक्ट्रिक वर्कर्स युनियन बरोबर चर्चा सुरु आहे.

(३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## शासन इलेक्ट्रिक वाहनांना प्राधान्य देत असल्याबाबत

**(४२) * ४७९१७ ॲड.निरंजन डावखरे :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शासनाकडून इलेक्ट्रिक वाहनांना प्राधान्य देण्यात येत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यात आगामी काळात इलेक्ट्रिक वाहनांसाठी चार्जिंग स्टेशन बसविण्याची योजना आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने कृती आराखडा तयार केला आहे काय,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.चंद्रशेखर बावनकुळे :** (१) व (२) हे खरे आहे. उद्‌योग, ऊर्जा व कामगार विभागाद्‌वारे दिनांक १४/०२/२०१८ च्या शासन निर्णयानुसार राज्याचे इलेक्ट्रिक व्हेईकल प्रोत्साहन धोरण, २०१८ नुसार व केंद्र शासनाच्या चार्जिंग स्टेशन बाबतच्या मार्गदर्शक तत्वानुसार चार्जिंग स्टेशन उभारण्यात येत आहेत.

(३) इलेक्ट्रिक वाहनांसाठी चार्जिंगच्या सुविधा पुरविण्याकरीता राज्यातील महावितरण कंपनीला राज्य समन्वय अभिकरण म्हणून नियुक्त करण्यात आले आहे.

महावितरणमार्फत विविध ठिकाणी जसे महावितरण कार्यालये, उपकेंद्रामधील अतिरिक्त जागेमध्ये ५०० विद्युत वाहन चार्जिंग केंद्र उभारण्याचे नियोजित आहे. सदर प्रकल्प टप्प्या-टप्प्यात राबविण्यात येत असून प्रथम टप्प्यात ५० विद्युत वाहन चार्जिंग केंद्र विविध शहरामध्ये महावितरणच्या उपकेंद्रामध्ये उपलब्ध असलेल्या अतिरिक्त जागेमध्ये उभारण्यात येणार असून याकरीता महावितरणद्वारे निविदा प्रसारित करण्यात आली असून पुढील कार्यवाही करण्यात येत आहे. तसेच पुणे येथील बानेर व नागपूर येथील अमरावती रोड येथे प्रत्येकी एक जलद DC चार्जिंग केंद्र प्रायोगिक तत्वावर महावितरणद्वारे उभारण्यात आले आहे.

इलेक्ट्रिक वाहनांच्या चार्जिंगकरीता मुंबई शहरात बॅकबे आगारात व वरळी आगारात बृहन्मुंबई विद्युत पुरवठा व परिवहन उपक्रमामार्फत प्रत्येकी एक चार्जिंग युनिट बसविण्यात आलेले असून धारावी बस आगारामध्ये २० व बॅकबे आगारामध्ये २७ चार्जिंग युनिट बसविण्याचे प्रस्तावित आहे. तसेच टाटा पॉवर कंपनी मार्फत राज्यात १०० चार्जिंग केंद्र उभारण्याचे प्रस्तावित असून आतापर्यंत मुंबईत २० चार्जिंग केंद्र उभारण्यात आली आहेत.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## गडचिरोली कृषी उत्पन बाजार समितीच्या सभापती यांनी गैरव्यवहार केल्याबाबत

**(४३) * ४८५५५ प्रा.अनिल सोले :** सन्माननीय **पणन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गडचिरोली कृषी उत्पन बाजार समितीचे तत्कालीन व सद्य:स्थितीतील सभापती यांनी दिनांक ७ फेब्रुवारी, २००९ ते १४ नोव्हेंबर, २०१४ या कालावधीत आपल्या सभापती पदाच्या कार्य काळात विविध कामामध्ये गैरव्यवहार केला आहे, सन २००९ ते २०१३ या काळात विमान प्रवास अनुज्ञेय नसताना सुध्दा अनधिकृतपणे प्रवास केलेला असून तत्कालीन प्रशासकाने त्यांचेकडून विमान प्रवास व रेल्वे प्रवासांची संपूर्ण रक्कम वसूल न करता केवळ त्यातील तफावत रक्कम भरण्यास सांगितले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, बेकायदेशीरपणे कर्मचाऱ्यांची भरती केलेल्या प्रकरणात लाच घेतांना लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने सभापती यांना दिनांक २३ एप्रिल, २०१४ रोजी वा त्यासुमारास पकडले असून शासनाने याबाबत कोणतीही कार्यवाही केलेली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, बहुमत नसताना त्यांच्या सभापती पदावर अविश्वास ठराव पारित झालेला असताना जुन्या ठरावाच्या आधारे ठराव पारित करून अनेक कामामध्ये गैरव्यवहार केलेला आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.सुभाष देशमुख :** (१) अंशत: खरे आहे.

गडचिरोली येथील चामोर्शी कृषी उत्पन्न बाजार समितीचे तत्कालीन व सद्य:स्थितीतील सभापती यांनी दिनांक ७ फेब्रुवारी, २००९ ते १४ नोव्हेंबर २०१४ या कालावधीत केलेल्या गैरव्यवहाराबाबत लेखापरिक्षण अहवालात निदर्शनास आले नाही. तथापि, सभापती श्री.अतुल गण्यारपवार यांनी बाजार समितीकडून घेतलेली अग्रिम उचल दिर्घ काळाकरीता स्वत:कडे बाळगणे यासारखा प्रकार निदर्शनास आला.

तसेच सन २००९ ते २०१३ या काळात सभापती यांनी विमान प्रवास अनुज्ञेय नसताना त्यांनी विमान प्रवास केला. त्यामुळे सदर विमान प्रवास व रेल्वे प्रवासाची संपूर्ण रक्कम वसुल न करता केवळ त्यातील तफावत रक्कम भरण्यास कळविले होते.

(२) हे खरे नाही.

दिनांक २३/०४/२०१४ रोजी बांधकाम कंत्राटदार यांचे तक्रारीवरून लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने कार्यवाही केली आहे. सदरचे प्रकरण न्यायप्रविष्ट आहे.

(३) नाही.

श्री.अतुल गण्यारपवार यांचेविरुध्द सन २००९ ते २०१४ या कालावधीत दिनांक २७/०७/२०१२ रोजी अविश्वास ठराव घेण्यात आला. परंतु सदर अविश्वास ठराव पारित करण्यात आला नाही. तद्नंतर दिनांक

२४/०२/२०१४ रोजी श्री.गण्यारपवार यांचेविरुध्द अविश्वास ठराव मांडण्यात आला. सदर अविश्वास ठरावावर मा.उच्च न्यायालय, खंडपीठ नागपूर यांनी अंतरिम आदेशाद्वारे स्थगिती दिली असल्याने दिनांक २४/०२/२०१४ रोजी मांडण्यात आलेला अविश्वास ठराव पारित करण्यात आला नाही.
(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## नवी मुंबई येथे स्वतंत्र विद्युत पुरवठा सबस्टेशन उभारण्याबाबत

**(४४) * ४८६३८ श्री.रमेशदादा पाटील, श्री.निलय नाईक, श्री.प्रविण दरेकर : दिनांक २८ फेब्रुवारी, २०१९ रोजी सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आलेल्या अतारांकित प्रश्नोत्तरांच्या यादी क्रमांक १० मधील प्रश्न क्रमांक ४५६७४ ला दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) तळवली, गोठीवली, रबाळे, नोसिलनाका व घणसोली नोड (नवी मुंबई) येथील वाढती लोकसंख्या, विकास कामे आणि जुन्या विद्युत वाहिनीमुळे येथील विद्युत पुरवठ्यावर ताण निर्माण होत असून वारंवार वीज पुरवठा खंडित होत असल्याने स्थानिक लोकप्रतिनिधी व रहिवाशांनी येथे स्वतंत्र विद्युत पुरवठा उभारण्याची मागणी माहे मे, २०१९ च्या प्रथम सप्ताहात शासनाकडे केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर भागांमध्ये सुरळीत विद्युत पुरवठा करण्यासाठी घणसोली भागात स्वतंत्र सबस्टेशन उभारण्याबाबतच्या प्रस्तावास दिनांक १२ ऑक्टोबर, २०१८ रोजी वा त्यासुमारास मंजुरी दिली असून हे उपकेंद्र उभारण्यासाठी लागणाऱ्या जागेबाबत सिडको कार्यालयाकडे मागणी करण्यात आलेली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, स्वतंत्र विद्युत सबस्टेशन उभारण्याबाबत मा.ऊर्जामंत्री यांनी महावितरणला आदेश दिले आहेत, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, सिडको कार्यालयाकडून सदरहू उपकेंद्र उभारणीसाठी जागा उपलब्ध करुन देण्याची कार्यवाही झाली आहे काय, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.चंद्रशेखर बावनकुळे :** (१) हे खरे आहे.
(२) हे खरे आहे.
(३) हे खरे आहे.
(४) सिडको कार्यालयाकडून सदरहू उपकेंद्र उभारण्यासाठी जागा उपलब्ध करुन देण्यात आली असून, जागेच्या हस्तांतरणाची कार्यवाही महावितरण कंपनीद्वारे करण्यात येत आहे.

-----------------

## वरळी येथील शासकीय परिवहन सेवा कर्मचारी सहकारी पतसंस्थेत गैरव्यवहार झाल्याबाबत

**(४५) * ४८७९४ श्री.प्रविण दरेकर, श्री.गिरीशचंद्र व्यास, श्री.नागोराव गाणार : तारांकित प्रश्न क्रमांक ३६५७६ ला दिनांक १५ डिसेंबर, २०१७ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबई शहरातील वरळी येथील शासकीय परिवहन सेवा कर्मचारी सहकारी पतसंस्थेत गेल्या सहा वर्षापासून सुरु असलेला गैरव्यवहार माहे मार्च, २०१९ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आला, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणातील दोषी संचालकांविरूध्द कारवाई करून त्यांच्याकडून अपहाराची संपूर्ण रक्कम वसूल करण्यात आली आहे काय, तसेच संस्थेच्या प्राधिकृत अधिकाऱ्यांकडून रक्कम वसूलीची सुरु करण्यात आलेली कार्यवाही पूर्ण झाली आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन आतापर्यंत किती संचालकांवर कोणत्या कलमान्वये कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.सुभाष देशमुख :** (१) अंशत: खरे आहे.

पतसंस्थेमधील गैरव्यवहार सन २०१४ मधील फेरलेखापरिक्षणात निदर्शनास आला आहे.

(२) व (३) पतसंस्थेचे सन २००७-०८ ते सन २०११-१२ या कालावधीतील फेरलेखापरिक्षण अहवालानुसार पतसंस्थेमध्ये अपहार झाल्याचे निदर्शनास आल्याने पतसंस्थेच्या १८ संचालकांवर दिनांक १९/०३/२०१९ रोजी वरळी पोलीस स्टेशन येथे गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे.

फेरलेखापरिक्षण अहवालाच्या अनुषंगाने संस्थेचे संचालक, अधिकारी व कर्मचारी अशा एकूण १७ अपचाऱ्यांवर रुपये ७९.४८ लाख इतक्या रक्कमेच्या नुकसानीची जबाबदारी महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियमाच्या कलम ८८ अन्वये निश्चित करण्यात आलेली आहे. या पतसंस्थेचे संचालक हे शासकीय परिवहन सेवेत कार्यरत आहेत. अशा कार्यरत असलेल्या ४ संचालकांच्या पगारातून दरमहा रुपये ५०००/- व १ संचालकाच्या पगारातून दरमहा रुपये ३०००/- इतकी रक्कम वसूल करण्यात येत आहे. तसेच उर्वरीत रक्कमेच्या वसूलीची कार्यवाही सुरु आहे.

महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० चे कलम ७८(अ) नुसार पतसंस्थेची कार्यकारिणी दिनांक २०/०५/२०१४ रोजीच्या आदेशान्वये बरखास्त करण्यात आलेली असून सद्य:स्थितीत पतसंस्थेवर प्राधिकृत अधिकारी कार्यरत आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## डहाणू (जि.पालघर) येथील शासकीय आदिवासी वसतिगृहातील कंत्राटी सफाई कर्मचारी व सुरक्षा रक्षकांचे वेतन देण्याबाबत

**(४६) * ४८९२७ श्रीमती विद्या चव्हाण, श्री.आनंद ठाकूर :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) डहाणू (जि.पालघर) येथील एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्पांतर्गत येणाऱ्या शासकीय आदिवासी वसतिगृहात व आश्रमशाळेत कार्यरत असलेल्या कंत्राटी सफाई कर्मचारी व २२ सुरक्षा रक्षकांना लोकसेवा सुशिक्षित बेरोजगार सेवा सहकारी संस्था (एम) महाराष्ट्र, जि.औरंगाबाद या संस्था चालकाकडून गेल्या तीन महिन्यापासून वेतन मिळाले नसल्याबाबत 'समर्थन' संस्थेने

दिनांक ८ फेब्रुवारी, २०१९ रोजी वा त्यासुमारास मा.मंत्री, आदिवासी विकास, मा.मंत्री, कामगार, प्रधान सचिव, कामगार व प्रधान सचिव, आदिवासी विकास यांच्याकडे लेखी निवेदन दिलेले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणाची शासनाने चौकशी करून अनेक महिन्यांपासून कंत्राटदाराने कंत्राटी सफाई कर्मचाऱ्यांच्या वेतनाची रक्कम न दिल्याने संबंधित कंत्राटदारावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. अशोक उईके :** (१) हे खरे आहे.

(२) एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, डहाणू अंतर्गत शासकीय आदिवासी वसतिगृहात व आश्रमशाळेत बाहयस्त्रोताद्वारे कर्मचारी उपलब्ध करुन देण्याबाबत लोकसेवा सुशिक्षीत बेरोजगार संस्था, औरंगाबाद यांना आदेश देण्यात आलेले आहेत. प्रकल्प अधिकाऱ्यांच्या सूचनेनंतर माहे जानेवारी व फेब्रुवारी, २०१९ चे वेतन अदा केले आहे. माहे मार्च, २०१९ व एप्रिल, २०१९ या दोन माहिन्याचे वेतन अदा केलेले नसल्यामुळे संस्थेला प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, डहाणू यांनी कारणे दाखवा नोटीस बजावली असून कंत्राटी सफाई कर्मचाऱ्यांना वेतन वेळेवर देण्याबाबत सूचित केले आहे.

लोकसेवा सुशिक्षीत बेरोजगार संस्था, औरंगाबाद यांच्याकडून माहे मार्च, २०१९ व एप्रिल, २०१९ या दोन महिन्याची देयके दिनांक २०/०५/२०१९ रोजी प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, डहाणू यांना प्राप्त झाली असून ती संस्थेस अदा करण्याबाबतची कार्यवाही प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, डहाणू यांच्याकडून सुरु आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## कृषी उत्पन्न बाजार समितीमधील कर्मचाऱ्यांना सेवेत कायम करण्याबाबत

**(४७) * ४७३७० श्री.हरिसिंग राठोड, श्री.रामहरी रुपनवर, डॉ.वजाहत मिर्झा, श्रीमती स्मिता वाघ :** सन्माननीय **पणन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कृषी उत्पन्न बाजार समितीमध्ये कार्यरत कर्मचाऱ्यांना सेवेत कायम करण्यासाठी विदर्भातील बाजार समितीतील शेकडो कर्मचाऱ्यांनी माहे मार्च, २०१९ मध्ये वा त्यादरम्यान काम बंद आंदोलन सुरु केल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शेकडो कर्मचारी संपात सहभागी झाल्यामुळे व्यवहार प्रभावित झाले असून सर्व सामान्य जनतेचे प्रचंड हाल होत आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार या कृषी उत्पन्न बाजार समितीमध्ये कार्यरत हंगामी, रोजंदारी कर्मचाऱ्यांना शासन सेवेत सामावून घेण्याबाबत शासनाचे धोरण काय आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. राम शिंदे :** (१) हे खरे आहे,

कृषी उत्पन्न बाजार समितीमध्ये कार्यरत कर्मचाऱ्यांना सेवेत कायम करण्यासाठी विदर्भातील अमरावती, नांदगाव खंडेश्वर, चांदुर बाजार, तिवसा, दर्यापूर, धारणी, मोर्शी, अंजनगावसुर्जी, धामणगाव रेल्वे व वरुड या बाजार समितीतील कर्मचारी यांनी काम बंद आंदोलन करुन दिनांक २८/०२/२०१९ रोजी करण्यात आलेल्या संपात शेकडो कर्मचारी सहभागी झाले होते.

(२) हे खरे नाही,

या संपामुळे बाजार समितीचे काम बंद होऊ नये याकरीता बाजार समितीत पर्यायी व्यवस्था करुन बाजार समितीचे व्यवहार सुरु करण्यात आले होते.

(३) राज्यातील कृषी उत्पन्न बाजार समितीच्या कर्मचाऱ्यांना शासनाच्या सेवेत सामावून घेण्यासंदर्भात दिनांक १४/०६/२०१७ रोजीच्या शासन निर्णयानुसार अभ्यास समिती गठीत करण्यात आली आहे. अभ्यास समितीने दिलेल्या शिफारशीवर निर्णय घेण्याकरीता कृषी उत्पन्न बाजार समितीच्या कर्मचाऱ्यांना कायम सेवेत सामावून घ्यावयाचे झाल्यास शासनाच्या

प्रशासकीय विभागाची म्हणजेच वित्त, विधी व न्याय व सामान्य प्रशासन विभागाचे अभिप्राय/सल्ला प्राप्त झाल्यानंतर आवश्यक कार्यवाही करण्यात येईल.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## साक्री तालुक्यातील (जि.धुळे) उमेदवार नोकरीपासून वंचित असल्याबाबत

**(४८) * ४८७२१ श्री.चंद्रकांत रघुवंशी, श्री.शरद रणपिसे :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) साक्री तालुक्यातील पेसा कायदयामध्ये सन १९८५ मध्ये शेडयुल एरिया जाहीर करुन ८० गावांचा समावेश करण्यात आला असून विभाजीत झालेल्या ६४ गावांचा समावेश न केल्याने गावातील तरुणांना नोकरीसाठी अर्ज करता येत नसल्यामुळे गावातील उमेदवार नोकरीपासून वंचित राहत आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, ६४ गावांना पेसामध्ये समावेश करण्याबाबत माहे मार्च, २०१९ मध्ये वा त्यादरम्यान आदिवासी विभागाकडे प्रस्ताव सादर करण्यात आला, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, ६४ गावांतील तरुणांना शासकीय योजनांच्या लाभासाठी पेसा कायदयाचा लाभ मिळावा यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) असल्यास, त्वरीत ६४ गावांचा पेसा कायदयान्वये समावेश करण्यात येणार आहे काय,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. अशोक उईके :** (१) व (२) होय, हे अंशत: खरे आहे.

आयुक्त, आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे यांचेकडून दिनांक ७ जानेवारी, २०१९ रोजीच्या पत्रासोबत अनुसूचित क्षेत्राच्या पुनर्रचनेचा प्रस्ताव शासनास प्राप्त झालेला आहे.

(३), (४) व (५) केंद्र शासनाने दिनांक २ डिसेंबर, १९८५ च्या अधिसूचनेद्वारे महाराष्ट्र राज्याचे अनुसूचित क्षेत्र घोषित केले आहे. सदरील अनुसूचित क्षेत्रामध्ये समाविष्ट असलेल्या गावांना पेसा कायदा लागू आहे.

आयुक्त, आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे यांचेकडून प्राप्त झालेल्या अनुसूचित क्षेत्राच्या पुनर्रचनेच्या प्रस्तावाची शासनस्तरावर छाननी सुरु असून शासन मान्यनेनंतर प्रस्तुत अनुसूचित क्षेत्राच्या पुनर्रचनेचा प्रस्ताव केंद्र शासनाच्या मान्यतेसाठी सादर करण्यात येणार आहे.

-----------------

## सफाळे (जि.पालघर) येथे ग्राहकांना जादा वीज देयके आकारल्याबाबत

**(४९) * ४६८५२ ॲड.अनिल परब, श्री.रविंद्र फाटक :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सफाळे (जि.पालघर) येथे गेल्या काही महिन्यांपासून महावितरण अधिकारी रिडींग न दाखवता मनमानी पध्दतीने विना छापील जास्तीची वीज देयके ग्राहकांना पाठवित असल्याची बाब दिनांक २१ मार्च २०१९ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, वीज देयकावर मीटरचे फोटो नसून वीज देयके वेळच्या वेळी मिळत नसल्याने ग्राहकांना देयके मुदतीच्या आत भरता येत नाहीत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने जास्तीची वीज देयके पाठविणाऱ्या संबंधित अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.चंद्रशेखर बावनकुळे :** (१) हे खरे नाही.

(२) महावितरण कंपनीने माहे फेब्रुवारी, २०१९ पासून वीज देयकावर मीटरचे फोटो छापणे बंद केले आहे. परंतु फोटो ग्राहकास महावितरण वेबसाईट वरील कंझ्युमर पोर्टलवर मीटर वाचनाच्या महिन्यात उपलब्ध असतो. तसेच प्रत्येक वीज ग्राहकांचे मीटर वाचन केल्यानंतर नोंदणी केलेल्या मोबाईल क्रमांकावर

चालू रिडींगसोबत वीज वापर, वीज बिल आकारणी रक्कम व वीज बिलाचा शेवटचा भरणा दिनांक इ. तपशील मोबाईल लघु संदेशाच्या (SMS) सहाय्याने कळविण्यात येत असल्याने त्या माहितीच्या आधारे वीज बिल भरणा ग्राहकास करता येऊ शकतो.
(३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यातील विनाअनुदानित मातोश्री वृध्दाश्रमांना अनुदान देण्याबाबत

**(५०) * ४७३१६ आर्कि.अनंत गाडगीळ, श्री.शरद रणपिसे, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.रामहरी रुपनवर, श्री.आनंदराव पाटील :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) शासनाच्या सामाजिक न्याय विभागांतर्गत सुरु असलेल्या राज्यातील २३ विनाअनुदानित मातोश्री वृध्दाश्रमांना अनुदान देण्याचा निर्णय मंत्रिमंडळ बैठकीत घेण्यात आल्याचे दिनांक ६ मार्च, २०१९ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, वृध्दाश्रमातील वृध्दांसाठी परिपोषण अनुदान म्हणून १५०० तसेच वृध्दाश्रमातील कर्मचाऱ्यांच्या मानधनाच्या खर्चास मान्यता देण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, शासनाने घेतलेल्या निर्णयानुसार हे अनुदान या वृध्दाश्रमांना कधीपासून देण्यात येणार आहे वा येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. सुरेश (भाऊ) खाडे :** (१) होय.
(२) होय.
(३) शासनाने घेतलेल्या निर्णयानुसार मातोश्री वृध्दाश्रमांना अनुदान शासन निर्णय निर्गमित झाल्याच्या दिनांकापासून देण्यात येणार असून याप्रकरणी नवीन लेखाशीर्ष घेण्याची तयारी शासनस्तरावर सुरु आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## शासनाच्या Gem पोर्टलवर फर्निचर वस्तुंसाठी विशिष्ट ठेकेदारांना झूकते माप देण्यात आल्याबाबत

**(५१) * ४६५९२ श्री.धनंजय मुंडे, श्री.अनिकेत तटकरे, श्रीमती विद्या चव्हाण, श्री.ख्वाजा बेग, श्री.विक्रम काळे, श्री.सतिश चव्हाण, श्री.जगन्नाथ शिंदे, श्री.किरण पावसकर :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शासनाच्या Gem पोर्टलवर दिनांक १२ जानेवारी, २०१९ रोजी वा त्यासुमारास सामाजिक न्याय विभागाकडून दहा फर्निचर वस्तुंसाठी मागविण्यात आलेल्या निविदेमध्ये एका विशिष्ट ठेकेदारास झुकते माप दिल्याने यासंदर्भात लोकप्रतिनिधीकडून माहे फेब्रुवारी, २०१९ मध्ये वा त्यादरम्यान पत्रव्यवहार करण्यात आला होता, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर निविदा राज्यातील लघु उद्योगासाठी राखीव असताना त्यामध्ये टोल फ्री नंबरची अट टाकण्यात आली होती, निविदेमध्ये भाग घेणाऱ्या उद्योजकांकडे काही वस्तुंसाठी BIFMA ची अट टाकण्यात आली होती, काही वस्तुंसाठी BIFMA ची अट नव्हती तसेच उर्वरीत वस्तुंसाठी कोणत्याही प्रमाणपत्राची मागणी करण्यात आलेली नव्हती, या सर्व तडजोडी एका विशिष्ट ठेकेदारासाठी करण्यात आल्या, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रक्रियेत अनियमितता झाली असल्याने ती रद्द करुन नव्याने निविदा प्रक्रिया राबविण्यात येणार आहे, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. सुरेश (भाऊ) खाडे :** (१) हे अंशत: खरे आहे.

(२) नाही.

(३) नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्याबाहेर उच्च शिक्षण घेणाऱ्या अनुसूचित जाती व जमातीच्या विद्यार्थ्यांना देण्यात येणारी फ्रीशिप बंद केल्याबाबत

**(५२) * ४८७४५ श्री.प्रकाश गजभिये :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बाहेरील राज्यात उच्च शिक्षण घेणाऱ्या अनुसूचित जाती व जमातीच्या विद्यार्थ्यांना देण्यात येणारी फ्रीशिप शासनाकडून बंद करण्यात आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अनुसूचित जाती व जमातीतील महाराष्ट्राबाहेर दुसऱ्या राज्यात शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना फ्रीशिपचा लाभ देण्यात येऊन आयआयटी, आयआयएम, विधी महाविद्यालय व केंद्र शासनाच्या इतर विद्यापीठात उच्च शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना याचा फायदा मिळत होता, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, बाहेरील राज्यात उच्च शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांचे शिक्षण अडचणीत आले आहे, शैक्षणिक शुल्काअभावी काही विद्यार्थ्यांना संबंधित महाविद्यालय, विद्यापीठांकडून शुल्काविषयी विचारणा होत आहे, सामाजिक न्याय विभागाकडून फ्रीशिप मंजूर करण्याबाबतचा तयार करण्यात आलेला प्रस्ताव गेल्या अनेक महिन्यापासून वित्त विभागात निर्णयासाठी प्रलंबित आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन यासंदर्भात कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. सुरेश (भाऊ) खाडे :** (१) व (२) अंशत: होय, राज्याबाहेरील महाविद्यालयात प्रवेशित अनुसूचित जाती प्रवर्गातील विद्यार्थ्यांना भारत सरकार मॅट्रीकोत्तर शिष्यवृत्ती लागू आहे. तर राज्यात भारत सरकार मॅट्रीकोत्तर शिष्यवृत्ती तसेच राज्य शासनाची मॅट्रिकोत्तर शिक्षण शुल्क परीक्षा शुल्क प्रतिपूर्ती योजना लागू आहे.

"भारत सरकार मॅट्रिकोत्तर शिष्यवृत्ती योजना" आणि राज्य शासनाची मॅट्रिकोत्तर "शिक्षण शुल्क परीक्षा शुल्क प्रतिपूर्ती योजना" या दोन वेगवेगळया योजना कार्यरत आहेत. परंतु, दिनांक १ नोव्हेंबर, २००३ च्या शासन निर्णयामध्ये, "शिष्यवृत्ती तसेच शिक्षण शुल्क व परीक्षा शुल्क" असा एकत्र शब्दप्रयोग करण्यात आलेला असल्याने, राज्याबाहेरील महाविद्यालयात प्रवेशित अनुसूचित जातीच्या विद्यार्थ्यांच्याबाबतीत शिक्षण शुल्क व परीक्षा शुल्क प्रतिपूर्तीचा लाभ दिला गेल्याचे दिसून येते.

तथापि, शासनाच्या मॅट्रिकोत्तर "शिक्षण शुल्क परीक्षा शुल्क प्रतिपूर्ती योजने" अंतर्गत दिनांक ३१/०३/२०१६ रोजीच्या शासन निर्णयानुसार राज्याबाहेरील शिक्षण संस्थेमध्ये शिकणाऱ्या विद्यार्थ्यांना मॅट्रिकोत्तर शिक्षण शुल्क व परीक्षा शुल्क प्रतिपूर्ती योजना देय ठरत नाही.

(३) नाही, राज्याबाहेरील ठराविक महाविद्यालयांमध्ये प्रवेशित अनुसूचित जाती प्रवर्गातील विद्यार्थ्यांना मॅट्रिकोत्तर शिक्षण शुल्क परीक्षा शुल्क प्रतिपूर्ती योजना लागू करण्याची बाब प्रस्तावित आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## पालघर जिल्ह्यात स्थानिक नागरिकांना वीज दरात सवलत देण्याबाबत

**(५३) * ४६८४६ श्री.आनंद ठाकूर, श्री.हेमंत टकले, श्री.धनंजय मुंडे, ॲड.राहुल नार्वेकर** : सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पालघर जिल्ह्यात तारापूर अणूऊर्जा प्रकल्प १ ते ४ तसेच डहाणू येथील अदानी औष्णिक वीज प्रकल्प असून देखील स्थानिक नागरिकांना महागडी वीज खरेदी करावी लागत आहे, हे खरे आहे काय.

(२) असल्यास, पालघर जिल्ह्यातील वीज ग्राहक संघटनेतर्फे वीज बिलांच्या समस्येबाबत दिनांक १२ फेब्रुवारी २०१९ रोजी वा त्यासुमारास जिल्हाधिकारी पालघर कार्यालयावर मोर्चा काढण्यात आला होता, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, तद्नुसार वीज दर कमी करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे.

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.चंद्रशेखर बावनकुळे :** (१) हे खरे नाही. महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगाने निश्चित केलेल्या वीज दरानुसार महाराष्ट्रातील सर्व ग्राहकांना वीज वितरण कंपन्यांद्वारे वीज बिल आकारणी करण्यात येते.
(२) हे खरे आहे.
(३) महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगाने निश्चित केलेल्या वीज दरानुसार महाराष्ट्रातील सर्व ग्राहकांना वीज बिल आकारणी करण्यात येत असल्याबाबत सदर वीज ग्राहक संघटनेला महावितरणमार्फत कळविण्यात आले आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## अमरावती विभागातील आदिवासी आश्रमशाळांची वेतन देयके अदा करण्याबाबत

**(५४) * ४७६८५ श्री.श्रीकांत देशपांडे :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) अमरावती विभागातील आदिवासी आश्रमशाळांची वेतन देयके अदा करतांना देयकांवर प्रकल्प अधिकारी यांची प्रतिस्वाक्षरी बंधनकारक असल्याने विभागातील वेतन देयके अति विलंबाने अदा होत आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, राज्यातील आदिवासी आश्रमशाळांचे वेतन देयके मंजूर व अदा करतांना प्रकल्प अधिकारी यांची प्रतिस्वाक्षरी देयकावर घेण्याच्या शासनाच्या सूचना असल्याने होत असलेल्या विलंबाची जबाबदारी निश्चित करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार संबंधितांवर कारवाई करण्यात येऊन अति विलंबाने वेतन देयके अदा केल्याने झालेल्या नुकसानाची भरपाई देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. अशोक उईके :** (१) प्रकल्प अधिकारी यांची स्वाक्षरी बंधनकारक आहे. तथापि, त्यामुळे देयके अदायगीस विलंब होतो हे खरे नाही.
(२), (३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## सांगोला नगरपरिषद (जि.सोलापूर) येथील सोलार प्रकल्प बंद असल्याबाबत

**(५५) * ४६८३३ श्री.रामहरी रुपनवर, अॅड.हुस्नबानू खलिफे, श्री.शरद रणपिसे :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सोलापूर जिल्ह्यातील सांगोला नगरपरिषदेच्या मागणीप्रमाणे महाराष्ट्र शासनाच्या मेढा संस्थेकडून मागील दीड वर्षापूर्वी सोलार पॅनल बसविण्यात आले होते, हे पॅनल बसविल्याने विजेची बचत होऊन कामात एकसुत्रीपणा आला होता तसेच वीज बिलाचा होणारा खर्चही बचत झाला होता परंतु सोलार प्रकल्प काही काळातच बंद झाला असल्याचे दिनांक १८ एप्रिल, २०१९ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, संबंधित नगरपालिकेस पुन्हा पैसे खर्च करुन वीज विकत घ्यावी लागत असून शासनाने चौकशी करुन सदरहु बंद सोलार पॅनलची देखभाल दुरुस्ती करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.चंद्रशेखर बावनकुळे :** (१) व (२) शासनाच्या महाऊर्जा या संस्थेकडून सांगोले नगर परिषद, सांगोले, जि. सोलापूर येथील कार्यालयावर दिनांक २८/०२/२०१७ रोजी ७ किलोवॅट क्षमतेचा पारेषण विरहीत सौर विद्युत संच आस्थापित करण्यात आला आहे. सदर संच माहे एप्रिल, २०१९ पासून बंद असल्याचे निदर्शनास आले होते.

सदरच्या पारेषण विरहीत सौर विद्युत संचाची ५ वर्षासाठी देखभाल व दुरुस्ती, सौर विद्युत संच आस्थापित करणाऱ्या कंपनीकडे असून, सदरच्या संचातील तांत्रिक दुरुस्ती सदर कंपनीमार्फत पूर्ण करण्यात येऊन संच दिनांक ३/०६/२०१९ पासून कार्यान्वित करण्यात आला आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## ढेकू (ता.खालापूर, जि.रायगड) औद्योगिक पट्टयामधील कारखान्यांनी महसूल थकित ठेवल्याबाबत

**(५६) * ४८९९६ श्री.जयंत पाटील :** सन्माननीय **वित्त मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ढेकू (ता.खालापूर, जि.रायगड) औद्योगिक पट्ट्यामध्ये असलेल्या १९ कारखान्यांनी शासनाचा लाखो रुपयांचा महसूल थकित ठेवला असून शासकीय नियम धाब्यावर बसवून मनमानीपणे कारभार चालविला असल्याची बाब माहे मार्च, २०१९ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या कारखान्यांच्या विरोधात नोटीसा बजावूनही पुढील कोणतीही कारवाई आजमितीस करण्यात आलेली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.सुधीर मुनंगटीवार :** (१) हे खरे नाही. ढेकू औद्योगिक पट्ट्यामधील १६ व्यापाऱ्यांकडे विक्रीकराची थकबाकी प्रलंबित असून त्याच्या वसूलीची कार्यवाही सुरु आहे.

(२) प्रश्न उद्‌भवत नाही.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## साखर कारखान्यांनी निर्धारित केलेल्या दरापेक्षा कमी दरात जादा साखरेची विक्री केल्याबाबत

**(५७) * ४७३६२ श्री.अनिल भोसले :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) केंद्र शासनाच्या नियमांकडे दुर्लक्ष करुन राज्यातील ८ साखर कारखान्यांनी निर्धारित केलेल्या दरापेक्षा कमी दरात जादा साखरेची विक्री

केल्याचे माहे एप्रिल, २०१९ च्या दुसऱ्या आठवड्यात निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, केंद्र शासनाने रुपये ३१०० प्रती क्विंटल भाव निर्धारित केलेला असताना त्यापेक्षा कमी दरात साखर विक्री करुन बिल मात्र रुपये ३१०० प्रमाणे काढण्यात आल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार किती कारखाने दोषी आढळले आहेत व त्यांच्यावर साखर आयुक्तांनी कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.सुभाष देशमुख :** (१) नाही.
(२) नाही.
(३) साखर आयुक्तालयाने १६६ साखर कारखान्यांचा माहे मार्च, २०१९ मधील साखर विक्रीचा आढावा घेतला असता आढाव्यामध्ये कोणत्याही साखर कारखान्याने रुपये ३१००/- प्रती क्विंटलपेक्षा कमी दराने साखर विकल्याचे आढळून आलेले नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## विक्रमगड, जि.पालघर येथील आदिवासी विकास प्रकल्पामधील ठक्करबाप्पा वस्ती सुधारणा योजनेत गैरव्यवहार झाल्याबाबत

**(५८) * ४७३४१ श्री.रविंद्र फाटक : तारांकित प्रश्न क्रमांक ४६१०७ ला दिनांक २९ नोव्हेंबर, २०१८ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) आदिवासी विकास प्रकल्पामधील विक्रमगड (जि.पालघर) ठक्करबाप्पा वस्ती सुधारणा योजनेत झालेल्या गैरव्यवहाराबाबत संबंधित यंत्रणाकडून लेखी खुलासा मागविण्यात आला होता, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त यंत्रणेकडून लेखी खुलासा शासनास प्राप्त झाला आहे काय, सदर लेखी खुलासानुसार संबंधित यंत्रणा दोषी आढळून आली आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन दोषी यंत्रणेविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. अशोक उईके :** (१), (२) व (३) आदिवासी विकास प्रकल्पामधील ठक्करबाप्पा वस्ती सुधारणा योजनेत झालेल्या गैरव्यवहाराबाबत संबंधित यंत्रणाकडून लेखी खुलासे प्रकल्प अधिकारी, जव्हार यांचे कार्यालयामार्फत मागविण्यात आलेले आहेत.

संबंधित यंत्रणेकडून प्रकल्प अधिकारी, जव्हार यांचे कार्यालयास लेखी खुलासे प्राप्त झालेले आहेत. सदर खुलाशावर सदर कार्यालयामार्फत कार्यवाही सुरु आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## सातारा जिल्हयातील उद्योगधंदे अडचणी आल्याबाबत

**(५९) * ४७९२९ श्री.आनंदराव पाटील, श्री.शरद रणपिसे, श्री.रामहरी रुपनवर, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, ॲड.हुस्नबानू खलिफे, डॉ.सुधीर तांबे, आर्कि.अनंत गाडगीळ, श्री.जनार्दन चांदूरकर, श्री.अमरनाथ राजूरकर, श्री.मोहनराव कदम :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) शासनाच्या महावितरणने पॉवर फॅक्टर राखण्यासाठी तयार केलेली नियमावली व त्यात झालेली वीज दरवाढ यामुळे सातारा जिल्ह्यातील उद्योगधंदे अडचणीत आले असून उद्योजकात अस्वस्थता पसरली असल्याचे दिनांक ८ एप्रिल, २०१९ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, यासंदर्भात शासनाने निर्णय घेऊन सदरील नियमावली व त्यातील वीज दरवाढ मागे घेण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.चंद्रशेखर बावनकुळे :** (१) हे खरे नाही.

(२) महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगाने दिनांक १२/०९/२०१८ च्या मध्यावधी आढावा याचिकेवरील आदेशात पॉवर फॅक्टर बाबत काही बदल केले होते. सदर पॉवर फॅक्टरच्या गणनेमध्ये झालेल्या बदलांमुळे ग्राहकांना त्यांच्या विद्युत प्रणालीत सुधारणा करण्यासाठी वेळ मिळावा म्हणून ग्राहक संघटनांनी महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगाकडे पुनर्विचार याचिका दाखल केल्या होत्या. आयोगाने या याचिकांवर दिनांक २/०१/२०१९ रोजी पॉवर फॅक्टर संबंधित आदेश पारित केले. त्यानुसार पॉवर फॅक्टर अनुज्ञेय मर्यादेत राखण्यासाठी योग्य त्या उपाययोजना करण्यासाठी ग्राहकांना दिनांक ३१/०३/२०१९ पर्यंतचा वेळ देण्यात आला आहे. जे ग्राहक माहे एप्रिल, २०१९ मध्ये आयोगाने निर्देशित केलेल्या सूत्राप्रमाणे आपला सरासरी पॉवर फॅक्टर अनुज्ञेय मर्यादेत म्हणजेच ०.९० व त्यापेक्षा अधिक (लीड व लॅग) राखतील त्यांना दिनांक १/०९/२०१८ ते ३१/०३/२०१९ या कालावधीतील लीड पॉवर फॅक्टरच्या दंडाच्या रक्कमेचा परतावा समान हप्त्यांमध्ये करण्यात येईल.

जर एखाद्या महिन्यात पॉवर फॅक्टर हा ०.९० (लीड व लॅग) पेक्षा कमी राहिल्यास ग्राहकांना त्या महिन्यातील परताव्याचा हप्ता देय राहणार नाही.

सरासरी पॉवर फॅक्टर ०.९५ पेक्षा अधिक (लीड किंवा लॅग) व १ पर्यंत असल्यास पॉवर फॅक्टर सवलत लागू राहील. सदर बदलामुळे होणाऱ्या फरकाच्या रकमेचा परतावा तीन समान हप्त्यामध्ये पात्र ग्राहकांना दिले जाईल.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## नायगाव (जि.नांदेड) तालुक्यातील लाभार्थ्यांना शासकीय योजनेचा लाभ मिळत नसल्याबाबत

**(६०) * ४७२८९ श्री.विप्लव बाजोरिया, श्री.अमरनाथ राजूरकर, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.शरद रणपिसे, श्री.रामहरी रुपनवर, श्री.आनंदराव पाटील, ॲड.हुस्नबानू खलिफे, श्री.हरिसिंग राठोड :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नायगाव (जि.नांदेड) तालुक्यातील लाभार्थ्यांना संजय गांधी, श्रावण बाळ योजनेंतर्गत शासकीय योजनेचा पुरेपुर लाभ मिळत नसल्याचे तसेच बरवडा परिसरातील बहुतांशी निराधार लोकांच्या अंगठ्याचे ठसे उमटत नसल्याच्या कारणावरुन गेले दोन ते अडीच वर्षापासून अनुदान मिळाले नसल्याचेही माहे एप्रिल, २०१९ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, नायगाव तालुक्यातील कृष्णूर येथील रहिवाशी जिजाई मोतीराम कागडे यांच्या अर्जानुसार दिनांक ३१ जुलै, २०१४ रोजी वा त्यासुमारास घेण्यात आलेल्या बैठकीत अर्ज मंजूर केला असूनही त्यांना माहे एप्रिल, २०१७ पासून मानधन मिळालेले नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, लाभार्थ्यांना शासकीय योजनेचा पुरेपुर लाभ तसेच मानधन मिळत नसल्याने त्यांच्यावर उपासमारीची वेळ आली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन लाभार्थ्यांना त्यांचे थकित अनुदान देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. सुरेश (भाऊ) खाडे :** (१) हे खरे नाही.

(२) श्रीमती कागडे यांचे बायोमॅट्रीक मशीनवर अंगठ्याचे ठसे उमटत नसल्याने तसेच बँक खाते आधारकार्डशी संलग्न नसल्याने माहे मार्च, २०१७ पासून अनुदान वाटप करताना तांत्रिक अडचण निर्माण झाली. तथापि, त्यांना दिनांक १७/०४/२०१९ रोजी प्रलंबित अनुदानाचे वाटप करण्यात आले आहे.

(३) हे खरे नाही.

(४) राज्यात विशेष सहाय्य योजनेतील कुष्ठरोगी, वयोवृध्द, हाताने व डोळयाने अपंग, मतिमंद, नाबालक तसेच ज्या लाभार्थ्यांचे आधारकार्ड अपडेट असूनसुध्दा त्यांचे बँक खाते काढताना केवायसी होत नसल्याने इ.तांत्रिक कारणाने लाभार्थ्यांना अनुदान वाटप करताना येणाऱ्या अडचणी विचारात घेऊन योजनेतील पात्र लाभार्थ्यांना वैयक्तिक बँक खात्यात अनुदानाचे वाटप करण्याबाबत दिनांक २३/०१/२०१९ रोजीच्या पत्रान्वये सर्व जिल्हाधिकारी यांना सूचना दिल्या आहेत.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## शेती क्षेत्रातील वाढत्या अनुत्पादक कर्जामुळे बँक ऑफ महाराष्ट्राने कृषी कर्ज वितरणावर मर्यादा घातल्याबाबत

**(६१) * ४७२४१ श्री.गोपिकिशन बाजोरीया, श्री.धनंजय मुंडे, श्री.अनिकेत तटकरे, श्री.सतिश चव्हाण, श्री.जगन्नाथ शिंदे, श्री.किरण पावसकर :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शेती क्षेत्रातील वाढत्या अनुत्पादक कर्जामुळे बँक ऑफ महाराष्ट्राने पाच विभागात कृषी कर्ज वितरणावर मर्यादा घातल्या असून १५ टक्क्यांपेक्षा अधिक एनपीए असलेल्या शाखेच्या शाखा व्यवस्थापकांचे कृषी कर्जाबाबतचे अधिकार माहे मे, २०१९ मध्ये वा त्यादरम्यान काढून घेतले आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यातील औरंगाबाद, सोलापूर, अकोला, लातूर आणि अमरावती विभागात ही मर्यादा लागू करण्यात आली असून ज्या बँक शाखेने दिलेल्या कृषी कर्जापैकी अनुत्पादक कर्जाचे प्रमाण १५ टक्क्यापेक्षा अधिक आहे अशा शाखांना ही बंधने लागू राहणार आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर निर्णयामुळे दुष्काळ व अन्य कारणामुळे अगोदरच अडचणीत आलेल्या शेतकऱ्यांना खरीप हंगामात पीक कर्ज मिळण्याबाबत अनेक अडचणी निर्माण झाल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन फेरविचार करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.सुभाष देशमुख :** (१) नाही.

कर्ज प्रस्तावास मान्यता देणे व सदर कर्जाचे वितरण करणेचे अधिकार देणे ही बँकेची धोरणात्मक बाब आहे. बँक ऑफ महाराष्ट्र ने नियमित शेतकऱ्यांना कर्जवाटपासाठी कोणतीही बंधने घातली नाहीत. तसेच शाखा स्तरावरील किसान क्रेडीट कार्डवरील कर्जवाटपाचे १०% वाढीसह मंजुरीचे शाखाधिकाऱ्यांचे अधिकार काढून घेतले नाहीत. मात्र बँकेकडे नव्याने कर्जमागणीचे प्रस्ताव व वाढीव कर्जमागणी मंजूर करण्याचे अधिकार क्षेत्रियस्तरावर दिले आहेत.

(२) कर्जवाटपाचे धोरण ठरविण्याचे अधिकार बँकांना असून त्याप्रमाणे बँक ऑफ महाराष्ट्राने कर्जवाटपाचे धोरण तयार केले आहे. उपरोक्त अनुक्रमांक १ मध्ये नमुद प्रमाणे ज्या शाखेचा एनपीए १५ टक्केपेक्षा जास्त आहे अशा शाखेकडील कर्ज मागणी प्रस्ताव मंजुरीचे अधिकार क्षेत्रियस्तरावर आहेत.
(३) नाही.

शेतकऱ्यांना तात्काळ कर्जपुरवठा करणेबाबत बँकेने क्षेत्रियस्तरावर कर्ज प्रक्रिया कक्ष (Credit Processing Cell) मजबुत करणेसाठी परिपत्रक निर्गमित केले असून क्षेत्रिय अधिकाऱ्यांना आवश्यक ते कर्ज वितरण अधिकारी/ क्षेत्रिय कृषी कार्यालय इ. सुविधा निर्माण करणेबाबत सुचित करण्यात आले असून कर्ज मंजुरी प्रस्तावावर १ ते २ दिवसात निर्णय घेण्याबाबत क्षेत्रिय अधिकाऱ्यांना बँकेने सूचना निर्गमित केलेल्या आहेत.
(४) व (५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## परभणी जिल्ह्यातील साखर कारखान्याच्या संचालक मंडळावर कारवाई करण्याबाबत

**(६२) * ४७८९२ श्री.विनायकराव मेटे :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) महाराष्ट्र शेतकरी शुगर लिमिटेड उत्तम नगर सायखेडी, सोनपेठ (जि.परभणी) येथील साखर कारखान्याने साखर मोलॅसीस तयार करुन त्यांच्या विक्रीतुन रुपये ५ कोटी ६५ लाख कमावले परंतु शेतकऱ्यांची रुपये २ कोटी ५ लाख देणे दिले नाही, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, मराठवाड्यातील शेतकरी कमी पर्जन्यामुळे चिंतेत असून त्यामध्येच साखर कारखानदार शेतकऱ्यांना नाहक त्रास देवुन आर्थिक पिळवणुक करीत असल्याकारणास्तव शेतकऱ्यांच्या आत्महत्येत वाढ होत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत शेतकरी व कारखान्याच्या संचालक मंडळाला पोलिसांनी तपासणीकरीता बोलावले असता तेथील संचालकांनी आमचा प्रकार फौजदारी गुन्हयाचा होत नाही अशी अरेरावाची भाषा करुन पोलिसांना व शेतकऱ्यांना कोणतेही सहकार्य केले नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन संचालक मंडळावर व कारखान्यावर कोणती कारवाई केली तसेच शेतकऱ्यांना त्यांची रक्कम मिळण्याबाबत कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.सुभाष देशमुख :** (१) अंशतः खरे आहे.

महाराष्ट्र शेतकरी शुगर लिमिटेड उत्तम नगर सायखेडी, सोनपेठ (जि.परभणी) या कारखान्यास सन २०१५-१६ या हंगामात मोलॅसीस विक्रीतून रुपये ६,०३,२०,०००/- प्राप्त झाले होते. सदर कारखान्याने २५३ शेतकऱ्यांचा ऊस गाळपासाठी घेऊन त्यांच्या ऊस बिलाचे पैसे रुपये २,१२,६२,५५५/- न देता सदर रकमेचा अपहार करून फसवणूक केल्याबाबत दिनांक ७/११/२०१६ रोजी पोलीस स्टेशन मुदखेड, जि.नांदेड येथे गु.र.नं. २००/२०१६ कलम ४०६ व ४२० भारतीय दंडविधान अंतर्गत गुन्हा दाखल केलेला आहे. सदर गुन्ह्याचा तपास चालू आहे.

(२) नाही.

(३) व (४) गुन्हा दाखल झाल्यानंतर संचालकांनी तपासात सहकार्य केले नाही व या प्रकरणी सदर कारखान्याचे चेअरमन हे सध्या न्यायालयीन कोठडीत असल्याने मा.न्यायालयात दोषारोप पत्र दाखल करीत असल्याचे पोलीस अधीक्षक, नांदेड यांनी कळविले आहे.

गाळप हंगाम २०१४-१५ आणि हंगाम २०१५-१६ मधील FRP रक्कम वसुलीकरीता साखर आयुक्त यांनी अनुक्रमे दिनांक ३/०६/२०१५ व दिनांक १८/०५/२०१६ च्या आरआरसी आदेशानुसार कारखान्याविरुध्द जिल्हाधिकारी, परभणी यांचेमार्फत कारवाई सुरू केली होती. त्यानुसार सदर कारखान्याची इमारत वगळून असलेल्या शेत जमिनीची ई-लिलाव पध्दतीने विक्री करण्यासाठी ई-निविदा मागविण्यात आली होती. परंतु, एकही लिलावधारकाने लिलावात सहभाग घेतलेला नसल्यामुळे सदर शेत जमिनीच्या ई-लिलावासाठी मुदतवाढ देवूनही प्रक्रिया पूर्ण होऊ शकली नाही. जिल्हाधिकारी यांनी या व इतर कारणास्तव वसूली झालेली नसल्याने उपरोक्त कारखान्याची RRC दिनांक २३/०८/२०१८ च्या पत्रान्वये साखर आयुक्तालयास परत केलेली आहे.

जिल्हाधिकारी, परभणी यांनी कारखान्याच्या स्थावर व जंगम मालमत्तेवर RRC रकमांचा बोजा चढवून ७/१२ उताऱ्यावर शासनाचे नाव लावणेत यावे व त्यानुसार पुढील कार्यवाही करणेसाठी सदर RRC प्रकरण जिल्हाधिकारी यांना दिनांक १४/०६/२०१९ रोजी परत पाठविण्यात आलेले आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## बोधडी व शनिवार पेठ (ता.किनवट, जि.नांदेड) येथे अवैधरित्या मद्य निर्मिती होत असल्याबाबत

**(६३) * ४७२५२ श्री.अमरनाथ राजूरकर, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.शरद रणपिसे, ॲड.हुस्नबानू खलिफे, श्री.रामहरी रुपनवर, श्री.आनंदराव पाटील, श्री.हरिसिंग राठोड :** सन्माननीय **राज्य उत्पादन शुल्क मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) बोधडी (बु.) व शनिवार पेठ, (ता.किनवट, जि.नांदेड) येथे प्रशासनाच्या दुर्लक्षामुळे हातभट्टीची दारु उत्पादित केली जात असल्याचे दिनांक १४ जानेवारी, २०१९ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन हातभट्टीवाल्यांवर कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.चंद्रशेखर बावनकुळे :** (१) व (२) होय, हे अंशतः खरे आहे.

किनवट तालुक्यातील बोधडी व शनिवार पेठ येथे माहे जानेवारी, २०१९ मध्ये अवैध दारू विक्री करणाऱ्यांविरूध्द एकूण ९ गुन्हे नोंदविण्यात आले असून ७ इसमांना अटक करुन गुन्ह्यांमध्ये रुपये ७०,६६८/- इतक्या रकमेचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

तसेच, उपरोक्त ठिकाणी पोलीस विभागामार्फत माहे जानेवारी, २०१९ मध्ये एकूण ६ गुन्हे दाखल करुन त्यामध्ये रुपये ८२,५००/- इतक्या रकमेचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

राज्य उत्पादन शुल्क विभागामार्फत पोलीस विभागाशी समन्वय साधून संयुक्त मोहिम तसेच या विभागामार्फत विशेष छापे मोहिम राबविण्यात येऊन अवैध मद्य निर्मिती, वाहतूक व विक्री ठिकाणांवर कारवाई केली जाते.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## हिंगोली येथे शिष्यवृत्ती योजनेची प्रक्रिया ऑफलाईन पध्दतीने राबविली जात असल्याबाबत

**(६४) * ४७११२ श्री.रामराव वडकुते, श्री.विक्रम काळे, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) हिंगोली जिल्हा परिषदेच्या समाजकल्याण विभागांतर्गत शालेय विद्यार्थ्यांना देण्यात येणाऱ्या सर्व शिष्यवृत्ती योजनेची प्रक्रिया ऑफलाईन पध्दतीने राबविली जात आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रक्रिया संथगतीने सुरु असून इंटरनेटद्वारे उत्पन्न होणाऱ्या अडचणींमुळे व तांत्रिक बिघाडामुळे शालेय विद्यार्थ्यांना अर्ज करण्यास अडचणी येत आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, हिंगोली जिल्ह्यातील किती शाळेतील विद्यार्थ्यांचे अर्ज जिल्हा परिषदेकडे आलेले आहेत, एकही पात्र विद्यार्थी शासनाच्या शिष्यवृत्तीपासून वंचित राहणार नाही याची दक्षता घेऊन किती विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती मंजूर करण्यात आली आहे,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तदनुसार विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती मिळण्यासंदर्भात कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. सुरेश (भाऊ) खाडे :** (१) होय, हे खरे आहे.
(२) अशी बाब आढळून आलेली नाही.
(३) हिंगोली जिल्हयातील सर्व संबंधित शाळांकडून जिल्हा समाजकल्याण अधिकारी यांच्याकडे शिष्यवृत्तीच्या सर्व योजनांतर्गत प्राप्त झालेल्या एकूण १७६९४ अर्जांपैकी १५९०७ विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती मंजूर करण्यात आली आहे.
(४) निधीच्या उपलब्धतेनुसार उर्वरीत विद्यार्थ्यांच्या शिष्यवृत्तीची रक्कम अदा करण्याची कार्यवाही जिल्हा समाजकल्याण अधिकारी, हिंगोली यांच्यामार्फत करण्यात येईल.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यात खाजगी बँकांच्या सहभागातून रोजगार निर्मितीचे धोरण राबविण्याबाबत

**(६५) * ४६७६९ श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.शरद रणपिसे, आर्कि.अनंत गाडगीळ, श्री.रामहरी रुपनवर, ॲड.हुस्नबानू खलिफे :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) शासनाने खाजगी बँकांच्या सहभागातून रोजगार निर्मितीच्या धोरणास मान्यता दिली असल्याचे दिनांक ३ मार्च, २०१९ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या धोरणाची अंमलबजावणी कधीपासून करण्यात येणार आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.सुभाष देसाई :** (१), (२) व (३) राज्य शासनाने औद्योगिक धोरण २०१९ हे दिनांक ०७/०३/२०१९ रोजी जाहीर केलेले आहे. सदर धोरणामध्ये रोजगार निर्मिती कार्यक्रम, सुक्ष्म, लघु व मध्यम उपक्रमांना संस्थात्मक पाठबळ व औद्योगिक समूह प्रवर्तन (क्लस्टर प्रमोशन) इ. विविध क्षेत्रासाठी विविध कार्यक्रम योजना राबविण्याचे ठरविलेले आहे. त्यानुसार रोजगार निर्मितीसाठी

“नविन फ्लॅगशिप योजनेचा शुभारंभ मुख्यमंत्री रोजगार निर्मिती योजना (CMEGP)” कार्यक्रम राबविण्यास शासनाने मान्यता दिली आहे. प्रस्तुत योजनेच्या अंमलबजावणीची कार्यप्रणाली निश्चित करणेसाठी विविध विभागाशी विचारविनिमय सुरु आहे.

-----------------

## रोहा-धाटाव औद्योगिक क्षेत्रात आगप्रतिबंधक, पर्यावरणविषयक उपाययोजना करण्याबाबत

**(६६) * ४७७९४ श्री.अनिकेत तटकरे, श्री.धनंजय मुंडे** : सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रोहा (जि.रायगड) येथील धाटाव औद्योगिक क्षेत्र येथे आग लागल्याची घटना घडल्यानंतर मा.मंत्री उद्योग यांनी त्याठिकाणी भेट दिली होती व त्या भेटीमध्ये आश्वासित करण्यात आलेल्या उपाययोजना संदर्भात कोणतीच कार्यवाही झालेली नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, धाटाव-रोहा या क्षेत्रात कामगारांमध्ये आगीविषयी भितीचे वातावरण निर्माण झाले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या औद्यागिक क्षेत्रातील केमिकल वेस्टेज पाईपलाईनव्दारे समुद्रात नेऊन सोडण्यासंदर्भात पर्यावरण विभागाने आश्वासित करुनही यासंदर्भात कोणतीही कार्यवाही झालेली नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तदनुसार औद्यागिक क्षेत्रातील केमिकल वेस्टेज पाईपलाईनव्दारे समुद्रात नेऊन सोडण्याची कार्यवाही किती कालावधी पूर्ण होणार आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.सुभाष देसाई :** (१) हे खरे नाही.

रोहा औद्योगिक क्षेत्रातील जुने फायर हायड्रंट बदलून नविन फायर हायड्रंट बसविण्यात आले आहेत. तसेच औद्योगिक क्षेत्रातील पर्यायी रस्त्याबाबत भूसंपादनाचा प्रस्ताव पुढील कार्यवाहीकरीता प्रादेशिक कार्यालय, म.औ.वि.म.पनवेल यांचेकडे पाठविण्यात आला आहे. इतर उपाययोजनांबाबत महामंडळाकडून कार्यवाही करण्यात येत आहे.

(२) हे खरे नाही.

औद्योगिक क्षेत्रामध्ये महामंडळातर्फे व कार्यरत कंपन्यांतर्फे आगीच्या प्रतिबंधासाठी व कामगारांच्या सुरक्षिततेसाठी योग्य त्या उपाययोजना करण्यात आल्या आहेत. त्यामुळे कामगारांमध्ये भितीचे वातावरण आहे अशी वस्तुस्थिती नाही.

(३) व (४) रोहा (जि.रायगड) येथील धाटाव औद्योगिक क्षेत्रामध्ये सन २००४ पासून सामाईक सांडपाणी प्रक्रिया केंद्र कार्यान्वित आहे. या केंद्राचे परिचलन, देखभाल व दुरूस्ती मे.रोहा ईंडस्ट्रीज असोसिएशन या संघटनेमार्फत महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाचे मापदंडानुसार व नियंत्रणाखाली करण्यात येते. सदर यंत्रणा कार्यान्वित झाल्यापासून महामंडळाने टाकलेल्या सांडपाणी एकत्रिकरण वाहिनीद्वारे कारखान्यांचे प्रक्रियायुक्त रासायनिक सांडपाणी सामाईक सांडपाणी प्रक्रिया केंद्रात सोडण्यात येते. प्रक्रियायुक्त सांडपाणी महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने सुचविल्यानुसार व एन.आय.ओ.ने सुचित केल्याप्रमाणे मौजे आरे खुर्द ते मौजे गोफण परिसरातील खाडीत खोल पाण्यात सोडण्यात येते.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यात भाजीपाल्यांचा तुटवडा झाल्याबाबत

**(६७) * ४७०८७ श्री.जनार्दन चांदूरकर, श्री.शरद रणपिसे, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.रामहरी रुपनवर, श्री.अमरनाथ राजूरकर, डॉ.सुधीर तांबे, अॅड.हुस्नबानू खलिफे, डॉ.वजाहत मिर्झा, श्री.हरिसिंग राठोड, श्री.मोहनराव कदम, श्री.आनंदराव पाटील :** सन्माननीय **पणन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईसह राज्यातील कृषी उत्पन्न बाजार समितीत भाजीपाल्याचा तुटवडा निर्माण झाला असल्याचे दिनांक १५ मार्च, २०१९ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, भाज्यांचे दर घाऊक आणि किरकोळ अशा दोन्ही बाजारांमध्ये वाढले असून ग्राहकांना आर्थिक भुर्दंड सोसावा लागत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन भाज्यांचे वाढलेले दर नियंत्रणात आणण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.सुभाष देशमुख :** (१) नाही.
(२) नाही.
(३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## चिचरगहाण (ता.वरूड, जि.अमरावती) येथील शेतकऱ्याने सावकारी कर्जामुळे आत्महत्या केल्याबाबत

**(६८) * ४८६४८ प्रा.अनिल सोले, श्री.नागोराव गाणार, श्री.रामदास आंबटकर :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) चिचरगहाण (ता.वरूड, जि.अमरावती) येथील सोपान शेलोटे व वंदना शेलोटे या शेतकरी कुटूंबाने घेतलेल्या सावकारी कर्जाबाबत सावकाराकडून वारंवार कर्ज मागणीचा तगादा लावल्याने शेतकऱ्यावर आत्महत्या करण्याची स्थिती निर्माण झाल्याचे दिनांक २९ एप्रिल, २०१९ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन सदर शेतकऱ्याला आत्महत्या करण्यास प्रवृत्त करणाऱ्या सावकारावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.सुभाष देशमुख :** (१) व (२) दैनिक देशोन्नती या वृत्तपत्रामध्ये दिनांक २९/०४/२०१९ रोजी प्रसिध्द झालेल्या मृतक सोपान शेलोटे यांच्या आत्महत्येच्या बातमीच्या अनुषंगाने सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, वरुड यांनी महाराष्ट्र सावकारी (नियमन) अधिनियम, २०१४ मधील तरतूदीन्वये चौकशी केली. त्यानुसार मृतक सोपान शेलोटे यांनी बजाज फायनान्स कंपनी या खाजगी वित्त पुरवठा कंपनीकडून दुरचित्रवाणी संच (टिव्ही) तसेच मोबाईल खरेदीसाठी घेतलेल्या कर्जाच्या वसूलीसाठी संबंधित कंपनीचे

प्रतिनिधी मृतकांच्या घरी गेल्याचे अहवालामध्ये नमूद केले आहे. त्यामुळे सोपान शेलोटे यांनी केलेली आत्महत्या सावकारी कर्ज वसूलीचा तगादा लावल्यामुळे झाल्याचे सकृतदर्शनी दिसून येत नाही.

मृतक सोपान शेलोटे यांच्या आत्महत्या प्रकरणी पोलीस स्टेशन, वरुड येथे गुन्हा क्र. २०८/२०१९ दिनांक ३०/०४/२०१९ रोजी दाखल करण्यात आला असून पोलिसांमार्फत पुढील तपास सुरु आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## अंबरनाथ (जि.ठाणे) येथील आदिवासींना मुलभूत सोयी सुविधा मिळणेबाबत

**(६९) * ४८७९७ श्री.प्रविण दरेकर, श्री.गिरीशचंद्र व्यास, श्री.नागोराव गाणार, श्रीमती विद्या चव्हाण, श्री.आनंद ठाकूर :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अंबरनाथ (जि.ठाणे) येथील मोरिवली पाडा, ठाकूर पाडा, करवले, काकाळे, बोहणोली, जावसई या आदिवासी पाड्यातील आदिवासींना पिण्याचे पाणी व मुलभूत सोयी सुविधा पुरविण्यात आल्या नसल्याने तेथील शेकडो आदिवासी बांधवांनी श्रमजीवी संघटनेच्यावतीने दिनांक ११ मार्च, २०१९ रोजी वा त्यासुमारास अंबरनाथ तहसिलदार कार्यालयावर मोर्चा काढून तहसिलदारांना मागण्यांचे निवेदन दिले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त निवेदनातील मागण्यांचे स्वरूप काय आहे व त्यानुषंगाने शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. अशोक उईके :** (१) हे खरे आहे.

(२) सदर निवेदनामध्ये शुध्द मुबलक पिण्याचे पाणी, अंतर्गत रस्ते, वीज व्यवस्था, स्मशानभूमी, घरकुल, रेशनिंग, जातीचे दाखले, आंगणवाडी इत्यादी सुविधा पुरविण्याबाबत मागणी करण्यात आली.

सदर निवेदनाच्या अनुषंगाने तहसिलदार, अंबरनाथ यांचे कार्यालयामार्फत तालुकास्तरीय विभाग प्रमुखांची बैठक दिनांक ११/०३/२०१९ रोजी आयोजित करण्यात आली होती. संबंधित मागण्यांच्या अनुषंगाने आवश्यक कार्यवाही करण्याबाबत सूचना संबंधित यंत्रणांना देण्यात आलेल्या आहेत.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

----------------

## राज्यातील शासकीय आदिवासी आश्रमशाळेतील विद्यार्थ्यांचे मृत्यूचे प्रमाण वाढल्याबाबत

**(७०) * ४८९३१ श्रीमती विद्या चव्हाण, श्री.आनंद ठाकूर :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील शासकीय आदिवासी आश्रमशाळेतील विद्यार्थ्यांचा मागील तीन वर्षात वेगवेगळ्या कारणांनी एकूण नऊ जणांचा मृत्यू झाल्याची बाब मा.आदिवासी विकास मंत्री, मा.सार्वजनिक आरोग्य मंत्री, सचिव, आदिवासी विकास विभाग तसेच आयुक्त आदिवासी विकास विभाग यांच्याकडे दिनांक ८ जानेवारी, २०१९ रोजी वा त्यासुमारास ‘समर्थन’ या संस्थेने लेखी निवेदनाद्वारे केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन सन २०१८-१९ पासून आश्रमशाळेत विद्यार्थ्यांचे मृत्यू प्रमाण रोखण्यासाठी कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. अशोक उईके :** (१) हे खरे आहे.

(२) माहे नोव्हेंबर, २०१८ पासून शासकीय आश्रमशाळेतील विद्यार्थ्यांचे मृत्यू रोखण्यासाठी ३०१ आश्रमशाळांमध्ये BVG या संस्थेमार्फत मोबाईल आरोग्य सेवा व उपचार व्यवस्था सुरु करण्यात आली आहे. तसेच माहे सप्टेंबर, २०१८ पासून २०१ आश्रमशाळांमध्ये अमेय लाईफ या संस्थेमार्फत विद्यार्थ्यांची सखोल तपासणी करून औषधोपचार करण्यात येत आहेत.

याव्यतिरीक्त शिक्षक व विद्यार्थ्यांना जीवन कौशल्य प्रशिक्षण देणे, आश्रमशाळांमध्ये किमान मुलभूत सुविधा पुरविणे, पोषक व सकस आहार देणे, आश्रमशाळेवर एएनएम च्या सेवा उपलब्ध करणे, आश्रमशाळेत प्रथमोपचार पेटी ठेवणे, आश्रमशाळेतील सिकरुम कार्यान्वित करणे, विद्यार्थ्यांना तातडीच्या उपचारासाठी खाजगी दवाखान्यात उपचार करणे अशा उपाययोजना करण्यात आल्या आहेत.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## मोखाडा (जि.पालघर) येथील लाभार्थी रमाई घरकुल योजनेपासून वंचित असल्याबाबत

**(७१) * ४६८६७ श्री.आनंद ठाकूर, ॲड.राहुल नार्वेकर, श्री.रामहरी रुपनवर, श्री.शरद रणपिसे, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.अमरनाथ राजूरकर, डॉ.सुधीर तांबे, ॲड.हुस्नबानू खलिफे, डॉ.वजाहत मिर्झा, श्री.हरिसिंग राठोड, श्री.मोहनराव कदम, श्री.आनंदराव पाटील :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मोखाडा (जि.पालघर) येथील रमाई घरकुल योजना पूर्णपणे असफल झाली असल्याचे दिनांक ४ मार्च, २०१९ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मोखाडा तालुक्यातील ४१ लाभार्थ्यांनी सन २०१७ मध्ये घरकुल योजनेसाठी अर्ज केले असून सन २०१९ पर्यंत आदिम जातीसाठी असलेल्या घरकुलांना मंजुरी न मिळाल्याने लाभार्थी पंचायत समितीकडे वारंवार चौकशी करीत आहेत, हे ही खरे आहे काय.

(३) असल्यास, आर्थिक दृष्टया दुर्बल घटकातील व्यक्तींची निवाऱ्यांची गरज पूर्ण करण्याकरीता शासनाने अनुसूचित जातीसाठी रमाई घरकुल आवास योजना कार्यान्वित केली, परंतु स्थानिक प्रशासनाच्या दुर्लक्षामुळे या योजनेतील प्रस्तावाना मंजुरी देण्यात आली नसल्याने संबंधितांना या योजनेचा लाभ मिळू शकत नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार लाभार्थींना सदर घरकुल योजनेचा लाभ किती कालावधीत देण्यात येणार आहे.

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. सुरेश (भाऊ) खाडे :** (१) हे खरे नाही.

(२) सन २०१७-१८ या आर्थिक वर्षाकरीता अनुसूचित जातीकरीता रमाई आवास ग्रामीण योजनेंतर्गत पालघर जिल्ह्यासाठी एकूण १२९ लक्ष्यांक होते. पैकी मोखाडा तालुक्याकरीता ११ चे लक्ष्यांक देण्यात आलेले होते. त्यानुसार अनुसूचित जातीच्या १० लाभार्थ्यांच्या निवडीस मंजूरी देण्यात आलेली आहे.

(३) हे खरे नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## शहापूर (जि.ठाणे) तालुक्यातील आश्रमशाळांमध्ये शिक्षकांची रिक्त पदे भरण्याबाबत

**(७२) * ४७३५१ श्री.रविंद्र फाटक :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शहापूर (जि.ठाणे) तालुक्यातील २३ आश्रमशाळांमध्ये सुमारे ६९ शिक्षकांची पदे रिक्त आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त रिक्त पदे राहण्यामागची कारणे काय आहेत,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन सदरहू रिक्त पदे भरण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. अशोक उईके :** (१) अंशत: खरे आहे.

शिक्षकांच्या ६७ जागा रिक्त आहेत.

(२) नियतकालीन सेवानिवृत्ती, मृत्यू, राजीनामा, बदली इत्यादी कारणामुळे सदर पदे रिक्त झाली आहेत.

(३) रिक्त जागा भरण्यासाठी विशेष भरती मोहिम फेब्रुवारी, २०१९ मध्ये राबविण्यात आली असून निवड प्रक्रिया अंतिम टप्प्यात आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## सातारा जिल्ह्यात विजेचे भारनियमन होत असल्याबाबत

**(७३) * ४७९२८ श्री.आनंदराव पाटील, श्री.शरद रणपिसे, श्री.रामहरी रुपनवर, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, ॲड.हुस्नबानू खलिफे, डॉ.सुधीर तांबे, आर्कि.अनंत गाडगीळ, श्री.जनार्दन चांदूरकर, श्री.अमरनाथ राजूरकर, श्री.मोहनराव कदम :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सातारा जिल्ह्यात मार्च अखेर विद्युत वितरण कंपनीने वीज बिले भरण्यासाठी ग्राहकांकडे वारंवार विचारणा केली असून त्यामुळे कर्मचारी व्यस्त असल्यामुळे येथे गेल्या १५ दिवसापासून सातत्याने दिवसातून ८ ते १० वेळा वीज पुरवठा खंडीत होत असून सर्वसामान्य ग्राहक हैराण झाले असल्याचे दिनांक ६ एप्रिल, २०१९ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर जिल्ह्यातील भारनियमन मागे घेण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.चंद्रशेखर बावनकुळे :** (१) राज्यात सातारा जिल्ह्यासहित दर महिन्याला वीज बिल वसुलीची कामे करण्यात येतात. तसेच आर्थिक वर्ष मार्च महिन्यामध्ये संपत असल्याकारणाने वर्षाअखेर शिल्लक असलेली वीज बिल थकबाकी वसुली मोहीम राज्यात महावितरण कंपनीमार्फत राबविण्यात येते. तथापि, या कालावधीत सातारा जिल्ह्यामध्ये १५ दिवसांपासून सातत्याने दिवसातून ८ ते १० वेळा वीज पुरवठा खंडीत झालेला नाही.
(२) व (३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## औंढा नागनाथ (जि.हिंगोली) महावितरण कार्यालय मालमत्ता कर थकित असल्यामुळे बंद केल्याबाबत

**(७४) * ४७११९ श्री.रामराव वडकुते, श्री.विक्रम काळे, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) हिंगोली जिल्ह्यातील औंढा नागनाथ महावितरण कार्यालयाकडे मागील २० वर्षांपासून नगर पंचायतीचा रुपये २२ लक्ष ८४ हजार मालमत्ता कर थकीत असून हा कर भरला नसल्यामुळे नगर पंचायत कार्यालयाने दिनांक २८ मार्च, २०१९ रोजी वा त्यासुमारास महावितरण कार्यालय बंद केले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, महावितरण कार्यालय बंद करण्यापूर्वी सब स्टेशनचा विद्युत पुरवठा खंडीत करण्यात आल्यामुळे शहर व तालुक्यातील ५२ गावांचा विद्युत पुरवठा खंडीत अवस्थेत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, हा विद्युत पुरवठा पुर्ववत सुरु करण्यासाठी कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.चंद्रशेखर बावनकुळे :** (१) हे खरे आहे.

(२) ३३/११ के.व्ही. औंढा नागनाथ उपकेंद्र हे दिनांक २८/०३/२०१९ रोजी दुपारी २.४० वाजता बंद केले होते. त्यामुळे २५ गावांचा वीज पुरवठा खंडीत झाला होता.

(३) महावितरणचे अधिकारी व मुख्याधिकारी नगरपंचायत औंढा नागनाथ यांच्या समवेत कर आकारणीबाबतचा प्रश्न समन्वयाने सोडविण्याबाबत झालेल्या चर्चेअंती दिनांक २८/०३/२०१९ रोजी सायंकाळी ७ वाजता वीज पुरवठा पुर्ववत करण्यात आला आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यातील महादेव कोळी व इतर अनुसूचित जमातींना प्रमाणपत्र व वैधता प्रमाणपत्र देण्याबाबत

**(७५) * ४६७९४ श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.शरद रणपिसे, श्री.रामहरी रुपनवर, श्री.आनंदराव पाटील, ॲड.हुस्नबानू खलिफे, श्री.हरिसिंग राठोड, श्री.रमेशदादा पाटील, श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, श्री.प्रविण दरेकर :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील महादेव कोळी, डोंगर कोळी, कोळी मल्हार, कोळी ढोर, टोकरे कोळी, ठाकर, ठाकूर, मन्नेरवारलू, मन्नेवार, हलबा, माना, गोवारी, तडवी, भिल, धोबा इ. जमातींना केंद्र शासनाने विविध कायदे करुन ते अनुसूचित जमातीचे असल्याचे संवैधानिक अधिकार दिले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यातील अनुसूचित जमातीच्या जात वैधता प्रमाणपत्र तपासणीच्या कार्यामध्ये सुसत्रता नसल्याने अनेक वर्षापासून अनुसूचित जमातीतील आदिवासी बांधवांना जात वैधता प्रमाणपत्र मिळत नसल्याने त्यांना शासनाच्या अनेक सोयी-सुविधांपासून वंचित रहावे लागत असल्याचे माहे एप्रिल, २०१९ च्या शेवटच्या आठवड्यात निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर जमातींमध्ये एकूण ४७ पोटजातींचा समावेश असून अनुसूचित जातींना एक न्याय आणि अनुसूचित जमातींना दुसरा न्याय मिळत असल्याने सन १९७६ च्या कायद्यानुसार त्यांच्यावरील क्षेत्रिय बंधने काढून टाकली आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, अनुसूचित जमातींचे प्रमाणपत्र व वैधता प्रमाणपत्र देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. अशोक उईके :** (१), (२), (३), (४) व (५) भारतीय संविधानाच्या अनुच्छेद ३४२ (१) अन्वये मा.राष्ट्रपती महोदयांनी दिनांक ०६/०९/१९५० रोजी अनुसूचित जमातीची प्रथम यादी घोषित केली असून भारतीय संविधानाच्या अनुच्छेद ३४२ (२) अन्वये संसदेने त्यामध्ये वेळोवेळी सुधारणा केलेल्या आहेत. सदर सुधारणांच्या अनुषंगाने महाराष्ट्र राज्याच्या अनुसूचित जमातीच्या यादीत

Koli Mahadev, Dongar Koli, Koli Malhar, Tokre Koli, Koli Dhol, Thakur, Thakar, Mannervarlu, Halba, Mana, Tadvi, Bhil, Dhoba या जमातींचा समावेश असून त्यांना अनुसूचित जमातीचे लाभ अनुज्ञेय आहेत.

शासनाने राज्यामध्ये "महाराष्ट्र अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागास प्रवर्ग जातीचे प्रमाणपत्र (देण्याचे व त्याच्या पडताळणीचे विनियमन) अधिनियम २००० व त्या अंतर्गत "महाराष्ट्र अनुसूचित जमातीचे प्रमाणपत्र (देण्याचे व त्याच्या पडताळणीचे विनियमन) नियम २००३ लागू केलेले आहेत. नियम २००३ मधील नियम ३(३) व ३(४) नुसार कागदपत्रे सादर करणाऱ्या उमेदवारास अनुसूचित जमातीचे जात प्रमाणपत्र मिळते. तसेच नियम ११(२) मध्ये नमुद केलेली कागदपत्रे व पुरावे सादर करणाऱ्या उमेदवारास अनुसूचित जमातीचे वैधता प्रमाणपत्र मिळते. तसेच उक्त अधिनियमातील कलम ८ नुसार अनुसूचित जमातीचे फायदे घेणाऱ्या अर्जदाराने ज्या जमातीचा किंवा वर्गाचा आहे हे सिध्द करण्याची जबाबदारी असा दावा करणाऱ्या अर्जदारावर आहे. तसेच केंद्र शासनाच्या १९७६ च्या अधिसूचनेन्वये क्षेत्रबंधन शिथील करण्यात आले आहे. अनुसूचित जमाती प्रमाणपत्र तपासणी समित्यांकडील जात पडताळणीचे प्रलंबित सेवा प्रकरणी व शैक्षणिक प्रकरणाचे दावे निकाली काढण्यासाठी सर्व समितीस्तरावरुन विशेष मोहिम वेळोवेळी राबविली जाते.

-----------------

## श्रीवर्धन व महाड (जि.रायगड) विभागातील बॉक्साईडच्या अवैध खाणीबाबत

**(७६) * ४७७९५ श्री.अनिकेत तटकरे, श्री.धनंजय मुंडे :** सन्माननीय **खनिकर्म मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कारीवणे, ता.श्रीवर्धन व आडी, ता.महाड (जि.रायगड) येथे मे.आशापुरा एंटरप्राईजेसमार्फत अनेक ठिकाणी अनधिकृतपणे बॉक्साईटचे उत्खनन करण्यात येत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या उत्खननाविषयी ग्रामस्थांनी वेळोवेळी लेखी निवेदने देऊन विरोध केला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या उत्खननावेळी होणाऱ्या ब्लास्टींगमुळे तेथील घरांना तडे जाऊन ग्रामस्थांनी जीवनमान धोक्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, या उत्खननामुळे होणाऱ्या प्रदुषणामुळे स्थानिकांचे आरोग्यावर दुष्परीणाम होत आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, या उत्खनन खाणी बंद करण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.सुभाष देसाई :** (१) हे खरे नाही.
(२) पंचक्रोशी मायनींग विरोध संघर्ष समिती मु.मौजे आडी महाड खाडी, पो.कोलमांडले, ता.म्हसळा, जि.रायगड व मौजे कारिवणे, पो.कोलमांडले, ता.श्रीवर्धन, जि.रायगड यांनी दिनांक १८/०२/२०१९ रोजी या विभागात खनिज उत्खनन प्रकल्प कायमस्वरुपी बंद करण्याबाबत निवेदन जिल्हाधिकारी, सिंधुदुर्ग यांना प्राप्त झाले आहे.
(३) हे खरे नाही.

मौजे कारिवणे, ता.श्रीवर्धन आणि मौजे आडी, महाड खाडी, ता.म्हसळा, जि.रायगड येथे बॉक्साईट खनिज उत्खननाचे काम सुरु नाही. त्यामुळे तेथे ब्लास्टिंग होत नसल्याने तेथील घरांना तडे जाऊन ग्रामस्थांचे जीवनमान धोक्यात येण्याचा प्रश्न उद्भवत नाही.
(४) हे खरे नाही.
(५) व (६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## पेण (जि.रायगड) आदिवासी विकास प्रकल्प कार्यालयातील तत्कालिन प्रकल्प अधिकारी यांनी निधीचा अपहार केल्याबाबत

**(७७) * ४८८०६ श्री.प्रविण दरेकर, श्री.गिरीशचंद्र व्यास, श्री.नागोराव गाणार :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पेण (जि.रायगड) जिल्हा आदिवासी विकास प्रकल्प कार्यालयातील तत्कालिन प्रकल्प अधिकारी यांनी व्हिजन इन्फोटेक संस्था, कर्जत, पेसिडन्ट इंडो इस्त्राईल ॲग्रो, वाशी, ॲकेडमी नाशिक संस्था, एमएससीआयटी कम्प्युटर संस्था, पनवेल, सामाजिक विकास ट्रस्ट, पेण उत्पादक सहकारी सोसायटी यांच्याशी संगनमत करुन वेगवेगळया योजनेतून सुमारे १४ लाख रुपयांच्या निधीचा अपहार केला असल्याचे माहे मे, २०१९ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी स्थानिक पोलीस स्थानकात कोणत्या कलमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन संबंधित दोषीवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. अशोक उईके :** (१) होय.

न्या.गायकवाड समितीने सादर केलेल्या चौकशी अहवालानुसार गैरव्यवहार झाल्याचे निदर्शनास आले आहे.

(२) स्थानिक पोलीस स्थानकामध्ये तक्रार अर्ज दाखल करण्यात आले आहेत.

(३) न्या.गायकवाड समितीने सादर केलेल्या चौकशी अहवालामध्ये नमूद दोषी अधिकारी/कर्मचारी आणि संस्थांविरुध्द संबंधित पोलीस स्टेशनमध्ये तक्रारी दाखल करण्यात आल्या असून, त्याचबरोबर अधिकारी/कर्मचाऱ्यांविरुध्द शिस्तभंगविषयक कार्यवाहीस सुरूवात करण्यात आली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**विधान भवन :**
**मुंबई.**

**जितेंद्र भोळे**
**सचिव (कार्यभार),**
**महाराष्ट्र विधानपरिषद**

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर करण्यात आली आहे.
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.